लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP

सांज दैनिक : मंगळवार - १९ सप्टेंबर २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १६७
पाने - ४
किंमत २ रूपये
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
संपादक: अशोक चिंचोले
epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक
दररोज
रात्री ८.३० वाजता
GET IT ON Google Play
VISHWA TRAVELS APP
विश्व ट्रॅव्हल्स
२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.
संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.
जिथे प्रवासाची व्याख्याच बदलते
Online Booking : www.vishwatravels.in


## संपादकीय......

### हे विघ्नहर्ता, आम्हास प्रेरणा दे

भारत पारतंत्र्यात असताना लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्य लढ्याबाबत समाजात जागरूकता निर्माण व्हावी म्हणून १८९४ मध्ये गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यास सुरूवात केली. (गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात अगोदर टिळकांनी चालू केले कि रंगारी यांनी या वादात आम्हाला पडायचे नाही.) गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरे करण्यामुळे निश्चीतच स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळाले. आज गणेश उत्सव मोठ्या उत्साहात, भव्य-दिव्य पद्धतीने साजरा केला जातो आहे. गणेश उत्सव दरम्यान हजारो कोटी रूपयांचा चुराडा होतोय. लाखो तरूण उत्सवाचे दहा दिवस अक्षरशा दिवस रात्र एक करून 'गणेश मंडळाच्या' कार्यात व्यस्त असतात. यात तरूणांचा १00% समावेश आहे. काय झाले माहित नाही, अशा उत्सवांना कोण खत-पाणी घालते? पण ज्या जागरूकता, प्रबोधन या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव चालू केला तो उद्देश आज नावालाही दिसत नाही. (एक-दोन अपवाद असतील) श्री गणेशाला विघ्नहर्ता म्हणून ओळखले जाते. देशाला स्वातंत्र्य मिळाले. देशाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. पण, मिळालेल्या स्वातंत्र्याचे सुराज्यात रूपांतर झाले का? हा मोठा प्रश्न आहे. जागरूकता-प्रबोधन हा गणेश उत्सव सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचा मुख्य उद्देश आपण विसरून गेलो आहोत. आज समाजात आपल्या जगण्याचे प्रश्न आहेत. नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटात सापडलो आहोत. विविध प्रश्न, समस्या, टंचाई, वशिलेबाजी, बेरोजगारी, लाचखोरी, भ्रष्टाचार, अनागोंदी, घराणेशाही, सरंजामशाही, शिक्षण-आरोग्याचे प्रश्न, बेकारी, जातीयवाद, पक्षीयवाद, स्वार्थी नेते, सत्तेसाठी वाट्टेल ते करणारे, यांच्या 'चक्रीवादळात' आपण सापडलो आहोत. गणेश उत्सव असो की, दहिहंडी, क्रिकेट, नेते-महापुरूष यांच्यासाठीचे उत्सवी थाटातील कार्यक्रम, पुढाऱ्यांच्या मागे-पुढे करणे, केवळ करमणूक प्रधान कार्यक्रमास प्राधान्य यातच तरूणाई व्यस्त दिसत आहे. एका कार्यक्रमात कालच आपल्याच परिसरातील नांदेडचे रहिवाशी, अमेरिकेतील हॉर्वर्ड विद्यापीठात संशोधक असलेले डॉ. सुरज एंगडे यांनी तरूणांनी गणेश उत्सव एक दिवस साजरा करावा व उरलेले नऊ दिवस, जिथे शासन पोहचले नाही अशा गाव-भागात जाऊन तेथील जनतेच्या पायाभूत सुविधांसाठी काम करावे असे म्हटले आहे. एवढेच नव्हे तर अन्य देशातील तरूणाई १८-१९ च्या वयात देशसेवेत असते. आपण मात्र उत्सवात व्यस्त असतो, असे म्हटले आहे. आता कोणी म्हणेल देश स्वातंत्र्य झाल्यामुळे 'स्वातंत्र्यसैनिक' व्हायची संधी नाही, पण स्वातंत्र्याचं 'सुराज्य' निर्माण करण्यासाठी का नाही आपण कामाला लागत. सामाजीक प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरत. समाजात सद्या बेकारी प्रचंड आहे. दोन अडीच हजार तलाठ्याच्या जागा असताना १४-१४ लाख उमेदवार नोंदणी करतात. साध्या मानधनावर कोतवालाची भरती करायची म्हणून जाहिरात निघाली. त्या पदासाठी ग्रॅज्युएट, पोष्ट ग्रुज्युएट मुली-मुलांनी परीक्षा दिली. परवा-परवा तर महाराष्ट्र सरकारने कंत्राटी नोकर भरतीसाठी नऊ खासगी कंपन्यांना कंत्राटे दिली आहेत. या कोणातरी पुढाऱ्यांचा आर्शीवाद असणाऱ्या कंपन्या कंत्राटी कामगार शासनाला पुरवणार. दहा-पंधरा हजार रूपयांच्या मानधनावर कंपनी मार्फत नोकरी मिळविण्याचा प्रकार म्हणजे शासनाचे निव्वळ अपयश आहे. सरकार हे काय अन् पुर्वीचं काय, कंत्राटी कर्मचारी भरती काही दिवसापासून चालू आहे आणि आम्ही मात्र उत्सवात व्यस्त आहोत. शिक्षण, आरोग्य, रोजगार देणे हे शासनाचे काम आहे. पण आजची तरूणाई शासनाच्या अशा निर्णयाविरूद्ध रस्त्यावर उतरत नाही. अशा विचाराने चालणारे सरकार हे तरूणाई संपवून टाकत आहे. तरूणांना लाचार बनवून, वाट्टेल तसा कारोभार करित आहे. शिवाय राज्य सरकारने अत्यंत वाईट असा आणखी एक निर्णय घेतला आहे. हे सरकार राज्यातील सरकारी शाळा चालवायला उद्योगपती, सामाजीक संस्था यांना देत आहे. अशा उद्योगपती-सामाजीक संस्थांनी ५-१० वर्षासाठी शाळा दत्तक घ्यायचे, एक-दोन कोटी रूपये देऊन आपल्या कोणाचेतरी नाव द्यायचे, शाळा चालवायच्या असा निर्णय आहे. उद्योजक-व्यापारी कशा काय शाळा चालविणार? ते फायदाच पाहतील. बहुतेक सरकारी शाळा या गाव-शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आहेत. त्यांचा डोळा त्या मौल्यवान जागेवर असणार, शाळांचा अर्थात शिक्षणाचा धंदा करणार. शासनाच्या या निर्णयाकडे आजचा तरूण गांभिर्याने पाहणार कि कुठल्यातरी उत्सवात नाचत राहणार हा प्रश्न आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मागास, अल्प उत्पन्न असणाऱ्या घटकातील मुलांच्या शिक्षणासाठी शाळा चालविल्या, त्यांनी अक्षरशा रूपया-रूपया गोळा करून शाळा-वसतीगृह चालविली. एका व्यापाऱ्याने त्यांना एक-एक रूपया कुठे मागत राहता, म्हणून त्यांनी मोठ्या रकमेच्या देणगीचा चेक समोर ठेवला, अट एवढीच होती कि त्या व्यापाऱ्याच्या आई-वडिलांचे त्या शाळेला नाव द्यायचे. हि अट ऐकून कर्मवीरांनी ती मदत नाकारली. आजचे सरकार मात्र एक कोटी, दोन कोटी, पाच कोटी रूपये द्या आणि राज्यातील सरकारी शाळांना तूमच्या आई-वडील अथवा कोणाचे नाव द्यायचे ते द्या असे प्रस्ताव मागवित आहे. सरकारचा हा निर्णय म्हणजे शिक्षणासारख्या महत्वाच्या अशा क्षेत्रातून 'सर्वांग' काढून घेण्याचा प्रकार आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचं असच वाटोळं झालं. आजही मोठमोठी माणसं दिसत आहेत. जवळपास सर्वजण सरकारी शाळेचे विद्यार्थी आहेत. सरकारने शाळांचे खासगीकरण करित आहे. उद्या गोरगरीब, मध्यमवर्गीय, मागास विद्यार्थ्यांना शाळेच्या दारात देखील उभे टाकता येणार नाही. सरकार कंत्राटी नोकर भरती करून शाळा, उद्योगपतींना चालवायला देऊन शिक्षणासारख्या प्रमुख जबाबदारीतून मुक्त होत आहे. लातूरला रेल्वे बोगी कारखाना आला सरकार तो चालवेल, हजारोंना रोजगार मिळेल असे वाटत असताना तो कारखाना चालवायला दोन कंपन्यांना दिला आहे. कशी रोजगार निर्मिती होईल? लातुरात सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल बांधून झाले आहे. मशिनरी आहे. तो खासगी डॉक्टरांना चालवायला दिल्याचे टेंडर मंजूर आहे. संभाजीनगरात नुकतीच राज्य मंत्रीमंडळाची बैठक झाली. या बैठकीत विविध योजना, त्यासाठीचा निधी जाहीर झाला तो म्हणजे आपल्याच मंत्री-आमदारांच्या मतदार संघात खैरात वाटावी तसे वाटण्यात आले. राज्यासमोर विशेष करून मराठवाड्यात पिण्याच्या पाण्याची भीषण परिस्थिती दिसत आहे. पाण्यासाठी ऑगस्ट-सप्टेंबर मध्ये 'मे' चे चटके सहन करित आहोत. तहान लागल्यानंतर 'बोरवेल' घेण्याचे दिवसही राहिले नाहीत. उद्या पाणी कसे मिळणार हा गंभीर प्रश्न आहे. एक दिवस सरकार पाणी पुरवठ्यासंदर्भात आम्ही पाणी पुरवठा करण्याचा पुरेपूर प्रयत्न करित आहोत. तरीही जनतेनी पाण्यासाठी पूर्णपणे सरकारवर अवलंबून राहू नये असे परिपत्रक काढून मोकळे होऊ शकते, एखादा रूग्ण आजाराने प्रदिर्घ काळ पडून असावा, त्याचा एक-एक अवयव निकामी होत जावा तसे सरकार आपला एक-एक विभाग खासगीकरणाच्या वाटेला सोडत आहे. आणि आजचा तरूण या-ना त्या उत्सवात दंग आहे. उद्याचं काय? हा प्रश्न आम्हाला पडत नाही. विघ्नहर्त्यासमोर प्रार्थना करून वर्तमान व भविष्य काळातील आमचे समोरील 'विघ्न' हटणार नाहीत. हे विघ्नहर्त्या, विघ्न घालविण्यासाठी कृती करण्याची आम्हाला (सरकारसह) प्रेरणा दे!

## ग्रामदैवत निळकंठेश्वराचे दर्शन घेवून जलसाक्षरता रॅली मार्गस्थ

निलंगा : ग्रामदैवत नीळकंठेश्वराचे दर्शन व आशीर्वाद घेत आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या जलसाक्षरता अभियानास गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर निलंगा येथून प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी गावोगावच्या नागरिकांनी या अभियानास उस्फुर्त प्रतिसाद दिला.हजारो जलयोद्ध्यांसह त्या-त्या गावातील गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, विविध संस्था,संघटनांचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांनी या रॅलीत सहभाग नोंदवला.

यावर्षी जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असून शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे.हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे या प्रमुख मागणीसह जिल्ह्यातील नागरिकांना जलसाक्षर करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. संपूर्ण गणेशोत्सवात राबविण्यात येणाऱ्या या अभियानास मंगळवारी निलंगा येथून प्रारंभ झाला.सकाळी वृंदावन मंगल कार्यालयात सर्वांचे एकत्रीकरण झाल्यानंतर ग्रामदैवत नीळकंठेश्र्वराचे दर्शन घेऊन अभियानास सुरुवात करण्यात आली. यावेळी नीळकंठेश्र्वराची महाआरती करण्यात आली.यानंतर माकणी थोर येथे नवसाला पावणाऱ्या हनुमानाचे दर्शन व महाआरती करण्यात आली.जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडावा,नागरिकांना पिण्यासाठी व पिकांसाठी पाणी उपलब्ध व्हावे,असे साकडे आ.निलंगेकर यांनी हनुमंताला घातले.

उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की, पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय जगणे शक्य नाही.यावर्षी आपल्या लातूर जिल्ह्यात अद्यापही पाऊस झालेला नाही त्यामुळे दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे.उर्वरित काळात पाऊस झाला नाही तर भीषण परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे.

दुष्काळातील उपाययोजना करण्यासाठी आपण शासनाकडे मागणी केलेली आहे.तरीदेखील उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करावा, पावसाच्या माध्यमातून मिळणारे पाणी साठवून ठेवावे या संदर्भात जनजागृती करण्यासाठी आपण हे अभियान राबवत आहोत.शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे. लातूरसह उस्मानाबाद व बीड जिल्ह्याची परिस्थिती पाहता शासनाने हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे,अशी आपली मागणी असल्याचे ते म्हणाले.

प्रारंभी संजय दोरवे व दगडू साळुंके यांनी प्रास्ताविक करून हे अभियान राबविण्यामागची भूमिका विषद केली. शेषराव ममाळे यांनी सूत्रसंचलन केले.पहिल्या दिवशी हलगरा, अंबुलगा, केळगांव, निटुरमोड, निटूर, पानचिंचोली, कोतल शिवणी, हाडगा या गावात ही रॅली पोहोचली.त्या गावातील उपस्थितांशी आ.निलंगेकर यांनी संवाद साधला.याप्रसंगी हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

### इच्छाशक्तीला हवी जनरेट्याची जोड...

यावेळी बोलताना आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सांगितले की,मराठवाड्याला चार वेळा मुख्यमंत्रीपद मिळाले.त्या



काळात दुष्काळी स्थिती कायमची दूर करण्यासाठी उपाय योजना करण्याची मानसिकता त्या-त्या नेत्यांनी दाखवली परंतु काही नेत्यांच्या दबावामुळे ते शक्य झाले नाही. नेत्यांच्या इच्छाशक्तीला जनरेट्याची जोड मिळाली असती तर शासनाला त्याची दखल घ्यावी लागली असती.

आता देखील शासनाने निर्णय घेतला आहे. त्याला जनरेट्याचे पाठबळ मिळावे म्हणूनच सरकारमध्ये असूनही आपण हे अभियान राबवित आहोत.शेती आणि उद्योगालाही पाणी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

### उत्स्फूर्त प्रतिसाद....

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी सुरू केलेल्या जलसाक्षरता अभियानास पहिल्याच दिवशी गावोगाव उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी ढोल- ताशांचा गजर व हलगीच्या निनादात दुचाकी रॅलीचे स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी जेसीबीच्या माध्यमातून रॅलीत सहभागी झालेल्या युवकांवर पुष्पवर्षाव करण्यात आला. रॅलीमध्ये रथात स्थापन करण्यात आलेल्या गणपतीची गावात आल्यानंतर आरती करण्यात आली.त्यानंतर आ.निलंगेकर उपस्थितांशी संवाद साधत असल्याचे दिसून आले.

### हक्काच्या पाण्यासाठी पाठिंबा पत्र

ठिकठिकाणी गणेश मंडळाचे पदाधिकारी,ग्राम पंचायतचे प्रतिनिधी, विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांचे पदाधिकारी, महिला बचत गट,महिला मंडळ व भजनी मंडळाच्या सदस्यांनी हक्काचे पाणी मिळवण्यासाठी आम्ही आपल्यासोबत आहोत असा संकल्प करून आपली पाठिंबापत्रे आ.निलंगेकर यांच्याकडे सुपूर्द केली.

## एन. ए. नंतरच्या शिल्लक जागेचा घोटाळा
## जागा विकली की नोंद नाही; चौकशीचे आदेश

लातूर : लातूर शहरासह तालुक्यामध्ये गेल्या अनेक दिवसापासून जमिनीचा एन. ए. केला जातो. एन. ए. मध्ये ग्रीन बेल्ट, रस्ते व इतर कामासाठी जागा सोडल्याचे दाखविण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात एन. ए. नंतर अशा शिल्लक जागा एक तर मुळ मालकाने विकल्या किंवा त्याची नोंद शासकीय मालकीची अशी न केल्याचा घोटाळा झाला असून या संदर्भात चौकशी करून अहवाल पाठवावा, असे आदेश लातूरच्या उपविभागीय महसूल अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी लातूर तहसीलदार यांना दिले आहेत.

शहरामध्ये अनेक जागा अशा आहेत की, एन. ए. च्या वेळी त्या सार्वजनीक उपक्रमासाठी सोडल्याचे दाखविण्यात आले आहे. या सर्व जागा या शासनाच्या मालकीच्या होतात. तशी नोंद सातबारावर देखील केली पाहिजे. पण, शहरातील अनेक भूखंड धारकांनी एन. ए. केले. सार्वजनीक उपक्रमासाठी जागा दाखविली. पण, नंतर एक तर त्या जागेची मुळ मालकाने विक्री केली किंवा त्या शिल्लक जागाची नोंद शासनाच्या मालकीत केली गेली नाही. या संदर्भात लातूर तालुक्यामध्ये अनेक घोटाळे झाल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ता मलिकार्जून भाईकट्टी यांनी निर्दर्शनास आणून दिले. तशा लेखी तक्रारी केल्या. त्यांच्या तक्रारीची दखल घेवून लातूरच्या उपविभागीय महसूल अधिकारी सौ. रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी लातूरच्या तहसीलदारांना एक पत्र देऊन या संदर्भातील चौकशी करावी अशा शिल्लक जागा मुळ मालकाने विकल्या काय? किंवा विकल्या नसतील तर त्या शासनाच्या नावे का केल्या नाहीत याबाबत तात्काळ चौकशी करून त्याचा अहवाल पाठवावा व एन. ए. नंतरच्या शिल्लक जागा शासनाच्या मालकीच्या नोंदी कराव्यात असे आदेश लातूरच्या तहसीलदारास दिले आहेत. चौकशी नि:पक्ष झाली तर तालुक्यामध्ये एन. एन. नंतरच्या शिल्लक जागेचे अनेक घोटाळे उघड होतील अशी शक्यता मलिकार्जून भाईकट्टी यांनी व्यक्त करून याची तात्काळ चौकशी व्हावी. ज्यांनी जमिनी विकल्या आहेत. त्या जमिनी शासनाने ताब्यात घ्याव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### त्यांच्या मते....

▣ **राज्यातील तरूणांनी एक दिवस गणेश उत्सव साजरा करून नऊ दिवस सरकार पोहचले नाही अशा ठिकाणी जाऊन रस्ते, पुल, शाळा, दवाखाने उभारणी व पायाभूत सुविधा, सार्वजनिक सोयी सक्षम करण्याचे काम करावे.** -डॉ. सुरज एंगडे

☛ उत्सव, जयंत्या, पुण्यतिथी, निवडणुका, नशा ठरताहेत.

▣ **सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रतिक्षा आहे. यामध्ये मी कसलीही दिरंगाई करणार नाही, पण कोणत्याही प्रकारची घाईही केली जाणार नाही.**
-विधानसभा अध्यक्ष नार्वेकर

☛ मागेही घाई झाली नाही, पुढेही होणार नाही याची खात्री आहेच.

▣ **धनगर समाजाबाबत अजित पवारांची भावना स्वच्छ नाही. ते लबाड लांडग्याचं लबाड पिल्लू आहे.**
- आ. गोपीचंद पडळकर

☛ फडणवीस साहेब, ठरवा आता लांडग्याचं पिल्लू कि वाघाचा 'बछडा'

▣ **माझा कुणाशीच पर्मनंट करार नसतो, म्हणून मी नेहमी सत्तेत असतो.**
- ना. अब्दूल सत्तार

☛ म्हणजे आगामी निवडणुकीत नवा 'पक्षोबा' निश्चीत दिसतोय.



### श्री गणेशाचे उत्साहात आगमन

आज गणेश चतुर्थी. सार्वजनीक गणेश मंडळाच्या प्रतिष्ठापनेबरोबरच घरोघरी मोठ्या प्रमाणात गणपती मूर्ती नेऊन प्रतिष्ठापना करण्यात आली. यंदा घरगुती गणेश मूर्ती प्रतिष्ठापना मोठ्या उत्साहाने होत असल्याचे चित्र पाहायला मिळत होते.

## लोकसभा-विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण?

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नव्या संसद भवनात महिला आरक्षणासाठी घटनेत दुरूस्तीचं विधेयक मांडणार असल्याची मोठी व पहिली घोषणा केली असून या विधेयकात महिलांना ३३ टक्के विधानसभा व लोकसभेत आरक्षण देण्यात येणार असल्याचे संकेत आहेत.



अटलजींच्या कार्यकाळात अनेक वेळा महिला आरक्षण विधेयक आणलं गेलं. पण ते विधेयक मंजुर करण्यासाठी डेटा गोळा करता आला नाही आणि त्यामुळे अटलजींचं स्वप्न अपूर्णच राहिलं. महिलांचं सक्षमीकरण आणि त्यांच्या शक्तीला आकार देण्याचं काम करण्यासाठी देवानं मला निवडलं आहे. पीएम मोदींनी महिला आरक्षणाला 'नारी शक्ती वंदन कायदा' असं नाव दिलं आहे.

महिला आरक्षण विधेयकांतर्गत विधानसभेच्या ३३ टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील. याशिवाय लोकसभेतही महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. म्हणजेच, १८१ जागा महिलांसाठी राखीव असतील. तसेच, दिल्ली विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे.

सध्याच्या लोकसभेत ७८ महिला खासदार आहेत, जे प्रमाण एकूण ५४३ च्या १५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू, तेलंगणा, त्रिपुरा आणि पुद्दुचेरीसह अनेक राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व १० टक्क्यांहूनही कमी आहे. दरम्यान, गेल्या काही आठवड्यात काँग्रेस, बीजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती सह अनेक पक्षांनी महिला आरक्षण विधेयक आणण्याची मागणी केली आहे.

## लातूर-जहीराबाद महामार्गाच्या दुरुस्तीसाठी स्वराज्य पक्षाचा उपोषणाचा इशारा

औराद शहाजानी : लातूर-जहिराबाद ७५२ (के) या महामार्गावर निलंगा तालुक्यातील मौजे सिरसी हंगरगा ते औराद शहा दरम्यान रस्त्यावर पडलेल्या भेगा व खराब झालेल्या रस्त्याची दुरुस्ती करणे व गाव परिसरात तसेच शाळेच्या ठिकाणी छोटे, छोटे गतीरोधक बसविण्याची स्वराज पक्षाची मागणी.

लातूर- जहीराबाद रस्ता हा निलंगा तालुक्यातील सिरसी हंगरगा पाटी पासुन औराद शहाजानी ईथपर्यंत भरपुर ठिकाणी खराब झालेला आहे व रस्त्यावर अनेक ठिकाणी जंप तयार झाल्यामुळे अनेक अपघात होत आहेत व अनेक लोकांनी जिव गमावलेले आहेत तसेच रस्त्यावर शाळा असलेल्या ठिकाणी वाहनांची गती जास्त असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच ज्या ठिकाणी गाव सुरु होते त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता असल्यामुळे तेथे अपघात होवू नये म्हणून कमी उंचीचे गतिरोधक तयार करण्याची मागणी स्वराज पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

निलंगा तालुक्यातील औराद शहा येथे तीन वर्षापासून अर्धवट अवस्थेत ठेवण्यात आलेल्या पुलाच्या कामामुळे व रस्त्यावर मधोमध खोदकाम करुन ठेवलेल्या खेड्यामध्ये भरपूर प्रमाणात घाण पाणी साचल्यामुळे तेथे दुर्गंधी पसरुन रोगराई वाढत आहे. शिवाय या खोदकाम करुन ठेवलेल्या खड्डयांमुळे अनेक लोकांचे अपघात झालेले आहेत तेथील तात्काळ पुलाच्या कामाची सुरुवात करण्याची मागणी करण्यात आली आहे. अश्या या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर यांचे मार्फत संबंधित रस्त्याचे मुख्य कार्यकारी अभियंता एम.एस.आर.डी.सी. यांना व पोलीस अधीक्षक लातुर आणि उपविभागीय अधिकारी निलंगा यांचेकडे निवेदन देऊन तात्काळ काम करण्याची मागणी केली आहे तसेच काम पुर्ण नाही झाले तर महात्मा गांधी जयंती दि. २ आक्टोंबर रोजी उपविभागीय कार्यालयाच्या समोर अमरण उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी यांना स्वराज पक्षाचे तालुकाध्यक्ष सौरभ थेटे, विकास शृंगारे, बालाजी इस्तरवाड, प्रसेनजीत लंगडे यांनी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.




## महाराष्ट्रानंतर आता कर्नाटकातही वाहतायेत सत्तांतराचे वारे! दावे-प्रतिदाव्यांना आला वेग

नवी दिल्ली : कर्नाटकात काँग्रेस सरकार स्थापन होऊन ४ महिन्यांहून अधिक काळ लोटला असला तरी अद्याप विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती झालेली नाही. कर्नाटकात भाजपा हा प्रमुख विरोधी पक्ष आहे, मात्र त्यांनी अद्याप विरोधी पक्षनेत्याची घोषणा केलेली नाही. याच पार्श्र्वभूमीवर भाजपाचे ज्येष्ठ आमदार बसनगौडा पाटील यांनी मोठा दावा केला आहे.

माध्यमांशी बोलताना बसनागौडा पाटील यांना विरोधी पक्षनेतेपदाच्या नियुक्तीबाबत विचारले असता ते म्हणाले की, काँग्रेसचे ४५ आमदार आमच्या पक्षाच्या संपर्कात आहेत, असा दावा करत आम्ही मुख्यमंत्री होणार असताना विरोधी पक्षनेतेपद का बसवायचे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

काँग्रेस नेते बी.के.हरीप्रसाद यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचा मुद्दा उपस्थित करत बसनागौडा पाटील यांनी म्हटले की, हा काँग्रेसचा अंतर्गत विषय आहे, पण बीके हरीप्रसाद यांच्या ज्येष्ठतेला त्यांनी महत्त्व दिलेले नाही. या सर्व घडामोडी बघता हे सरकार जानेवारीनंतर चालणार नाही, असे म्हणत ४५ आमदार आमच्या संपर्कात असल्याचे पुन्हा एकदा म्हटले. भाजपा आमदाराच्या वक्तव्यावरून कर्नाटकात सर्व काही सुरळीत होत नसल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्नाटकात आणखी तीन उपमुख्यमंत्री करण्याची मागणी होताना दिसत आहे. कर्नाटकात अल्पसंख्याक, एससी, एसटी आणि लिंगायत समाजातील प्रत्येकी एका नेत्याला उपमुख्यमंत्री करण्याची मागणी काँग्रेसच्या एका नेत्याने केली आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद असल्याचे चित्र आहे. दरम्यान, लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपा आणि जेडीएसमध्ये युती होऊ शकते, अशी चर्चा कर्नाटकात सध्या सुरू आहे. भाजपा पुढील लोकसभा निवडणुका ऋऊड सोबत मिळून लढवेल आणि भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वानेही लोकसभेच्या चार जागा देण्याचे मान्य केले असल्याचे राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते बीएस येडियुरप्पा यांनी ८ सप्टेंबर रोजी सांगितले होते. मात्र कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि जीडीएस नेते कुमारस्वामी यांनी युतीबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, आमच्यात अद्याप युती झालेली नाही. लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन्ही पक्ष एकत्र येण्याची गरज आहे की नाही, हे नंतर पाहू. यावेळी त्यांनी काँग्रेसवर निशाणा साधताना म्हटले की, काँग्रेस राज्याची लूट करत असून लोकांना पर्याय हवा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



## दडून बसलेल्या दहशतवाद्यांची आता खैर नाही; कोब्रा कमांडो शिकवणार चांगलाच धडा

दक्षिण काश्मिरमधील अनंतनागच्या जंगलात अड्डे बनवून दहशतवादी कारवाया केल्या जात आहे. या दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी भारतीय सैन्य आणि जम्मू पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेतली आहे.

नवी दिल्ली : दक्षिण काश्मिरमध्ये सध्या भारतीय सैन्याची दहशतवाद्यासोबत चकमक सुरु आहे. दोन दिवसापूर्वीच सैन्यातील महत्वाचे तीन अधिकारी शहीद झाले होते. त्यानंतरही अधून-मधून गोळीबार होत आहे. तर काही दशतवादी हे दडून बसलेले असून, त्यांचा शोध घेतल्या जात आहे. आता मात्र, त्यांचा शोध लावून खात्मा करण्यासाठी कुपवाडात सीआरपीएफचे कोब्रा कमांडो तैनात करण्यात आले आहे. दक्षिण काश्मिरमधील अनंतनागच्या जंगलात अड्डे बनवून दहशतवादी कारवाया केल्या जात आहे. या दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी भारतीय सैन्य आणि जम्मू पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेतली आहे. यातच दहशतवाद्यांनी जंगलांना अड्डे बनविल्याने आता कोब्रा कमांडोंनाच उतरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोब्रा कमांडोंच्या पहिल्या बॅचने नुकतेच जम्मूच्या जंगलात प्रशिक्षण पूर्ण केले आहे. या कमांडोंना कुपवाडामध्ये तैनात करण्यात आले आहे.

### कोब्रा कमांडोना काश्मीरमध्ये पाठविण्याची पहिलीच वेळ

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या कोब्रा कमांडोच्या पहिल्या तुकडीने जम्मू-काश्मीरच्या जंगलात प्रशिक्षण पूर्ण केले असून, कुपवाडा येथे तैनात करण्यात आले आहे. माओवादी बंडखोरांशी लढण्यासाठी २००९ मध्ये स्थापन करण्यात आलेली कमांडो बटालियन फॉर रिझोल्युट ॲक्शन (COBRA) मध्य आणि पूर्व भारतातून काढून जम्मू आणि काश्मीरमध्ये पाठवण्याची ही पहिलीच वेळ आहे.

बिहार आणि झारखंडमधून काही कोब्रा कंपन्या अंशतः मागे घेण्यात आल्या कारण तेथे नक्षलवादी हिंसाचाराची प्रकरणे कमी झाली. सहा महिन्यांपूर्वी जम्मू-काश्मीरच्या जंगलात त्याचे प्रशिक्षण सुरू झाले. आता प्रशिक्षण संपले आहे आणि त्यांना कुपवाडा येथे तैनात करण्यात आले आहे, परंतु ते अद्याप कोणत्याही ऑपरेशनमध्ये वापरले गेले नाहीत.

कोब्राची स्थापना अशा वेळी झाली जेव्हा भारताची अंतर्गत सुरक्षा नक्षलवादी हिंसाचारामुळे धोक्यात आली होती. गेल्या काही वर्षात कोब्राच्या पथकांनी आघाडीच्या नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. त्यांच्या मोहिमांमुळे नक्षलवादी हिंसाचार कमी झाला आहे. जंगल आणि डोंगराळ भागात दहशतवाद्यांशी मुकाबला करायचा झाल्यास ते त्यात तज्ज्ञ असतात. जम्मू-काश्मीर आणि ईशान्येकडील ठिकाणे जवळपास सारखीच आहेत. ते येत्या काही वर्षांत अशाच ठिकाणी वापरले जाणार आहेत.

### कॉंग्रेसच्या काळात मिळाली होती मंजुरी

ऑक्टोबर २००९ मध्ये जेव्हा अनेक नक्षलवादी हल्ले झाले तेव्हा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी माओवाद्यांना भारताच्या अंतर्गत सुरक्षेचा सर्वात मोठा धोका असल्याचे सांगितले होते. त्याच्या काही महिन्यांपूर्वी, सप्टेंबर २००८ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने सीआरपीएफमध्ये १० अतिरिक्त बटालियनच्या निर्मितीसह स्वतंत्र दलाच्या निर्मितीला मंजुरी दिली होती.

# जर महिला आरक्षण लागू झाले, तर कोणत्या राज्यात लोकसभेच्या किती जागा महिलांसाठी राखीव असतील?



नवी दिल्ली : महिला आरक्षण विधेयक पुन्हा एकदा चर्चेत, केंद्रीय मंत्रिमंडळाने महिला आरक्षण विधेयकाला मंजुरी दिली आहे. आता हे विधेयक विशेष अधिवेशनात लोकसभेत मांडले जाणार आहे. २७ वर्षांपासून प्रलंबित असलेले महिला आरक्षण विधेयक आणण्यासाठी विरोधक सातत्याने जोर लावत आहेत. विशेष अधिवेशनात या विधेयकाला सभागृहाने मंजुरी दिल्यास २०२४ मध्ये लोकसभेचे चित्र बदलू शकते. इतिहासात पहिल्यांदाच ३३ टक्के महिला सभागृहात दिसण्याची शक्यता आहे.

सध्या लोकसभेत महिला खासदारांची संख्या १५ टक्क्यांहून कमी आहे, आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे राज्यांच्या विधानसभांमध्ये ही संख्या दहा टक्क्यांहून कमी आहे. अशा परिस्थितीत लोकसभा आणि विधानसभेत महिला खासदार आणि आमदारांची संख्या वाढवण्यासाठी आरक्षणाची मागणी सातत्याने होत आहे. हे विधेयक २०१० मध्ये राज्यसभेत शेवटचे मांडण्यात आले होते, तेव्हा गदारोळात ते मंजूर झाले होते, परंतु लोकसभेत ते मंजूर होऊ शकले नाही.

संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षणाला मंजुरी मिळाल्यास लोकसभेच्या ५४५ जागांपैकी सुमारे १८० जागांवर म्हणजे ३३ टक्के महिलांना प्रतिनिधित्व मिळेल. या संदर्भात, आंध्र प्रदेशातील लोकसभेच्या २५ पैकी ८ जागा महिलांच्या ताब्यात असतील. आसाममध्ये १४ पैकी ५ जागा, बिहारमध्ये ४० पैकी १४, छत्तीसगडमध्ये ११ पैकी ४ जागा महिलांसाठी राखीव असतील.

गुजरातमध्ये लोकसभेच्या २६ जागा आहेत, ३३ टक्क्यांनुसार ९ जागा महिलांसाठी राखीव असतील, हरियाणामध्ये १० पैकी ४ जागा आणि हिमाचलमध्ये ४ जागांपैकी सुमारे १ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात. जम्मूमध्ये लोकसभेच्या ५ जागा आहेत, त्यापैकी २ महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात, १६ जागांसह झारखंडमध्ये हा आकडा ५ पर्यंत पोहोचू शकतो, कर्नाटकमध्ये २८ पैकी ९ आणि केरळमध्ये २० पैकी ७ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात.

लोकसभेतील महिला आरक्षणानुसार मध्य प्रदेशात २९ पैकी १० जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात, तर महाराष्ट्रात ४८ जागांच्या तुलनेत हा आकडा १६ वर पोहोचू शकतो, दिल्लीत ७ पैकी २ आणि ओडिशात २१ जागा पैकी ७ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात.

महिला आरक्षण लागू झाल्यानंतर पंजाबमध्ये लोकसभेच्या १३ पैकी ४ जागा राखीव ठेवल्या जाऊ शकतात, तर राजस्थानमध्ये २५ पैकी ८ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात, तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या ३९ जागा आहेत, आरक्षणानुसार, १३ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात.

उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या सर्वाधिक ८० जागा आहेत, महिला आरक्षण मंजूर झाल्यास जास्तीत जास्त २७ जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जाऊ शकतात, तेलंगणात १७ पैकी ६, उत्तराखंडमध्ये ५ पैकी २, पश्र्चिम बंगालमध्ये ४२ पैकी १४ जागा राखीव ठेवता येतील.

वर नमूद केलेल्या सर्व राज्यांमध्ये लोकसभेच्या ५० पेक्षा जास्त जागा आहेत, देशात अशी अनेक राज्ये आहेत ज्यांच्याकडे फक्त दोन किंवा १ लोकसभेची जागा आहे, यामध्ये अरुणाचल प्रदेशातील २, गोव्यातील २, मणिपूर-मेघालय, मिझोराममधील प्रत्येकी २ यांचा समावेश आहे. - नागालँड-पुडुचेरी, सिक्कीम आणि त्रिपुरामध्ये प्रत्येकी १ लोकसभेच्या जागा आहेत. याशिवाय केंद्रशासित प्रदेश, अंदमान निकोबार, चंदीगड, दादरा नगर हवेली, दमण आणि दीव, लक्षद्वीप, लडाखमध्ये प्रत्येकी १ लोकसभेची जागा आहे, यावर काय होईल हे सध्या ठरवलेले नाही. लोकसभेच्या ५४५ जागा आहेत, त्यापैकी केवळ ७८ जागांवर महिला खासदार निवडून आल्या आहेत, आकडेवारीनुसार हा आकडा १५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. राज्यसभेतही हीच स्थिती आहे, तिथेही केवळ १४ टक्के महिला खासदार आहेत. राज्याच्या विधानसभांमध्येही त्यांचे सरासरी प्रतिनिधित्व १० टक्क्यांपेक्षा कमी आहे.



## सगळी संकटे दूर करमुख्यमंत्री शिंदेंचं गणराया चरणी साकडं

मुंबई : देशभरात गणरायाच्या आगमनाने भक्तीपूर्ण वातावरण निर्माण झालं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 'वर्षा' निवासस्थानी विघ्नहर्त्यांची प्रतिष्ठापणा करण्यात आली. गणेशाची पूजा झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधत महाराष्ट्रातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच महाराष्ट्र समुद्ध व्हावा यासाठी गणरायाच्या चरणी साकडं घातलं असल्याची माहिती दिली.

'भक्तीभावाने आणि श्रद्धेने लोक आपापल्या घरामध्ये गणेशाची प्रतिष्ठापणा करतात आणि म्हणून आजचा दिवस महाराष्ट्रातल्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनातला आनंदाचा दिवस आहे. विघ्नहर्त्याला सकाळी साकडं घातलं की, या महाराष्ट्रावरचं बळीराजावरचं शेतकऱ्यावरचं संकट दूर होऊ दे. चांगला पाऊस होऊ दे. बळीराजाला चांगले दिवस येऊ दे आणि या महाराष्ट्रातल्या प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यामध्ये सुख समृद्धी येऊ दे अशी आमची भावना आहे. तसेच आमच्या प्रयत्नांना बळ विघ्नहर्ता, गणरायाने द्यावे अशी प्रार्थना केली. महाराष्ट्रातल्या सर्व नागरिकांच्या इच्छा आकांक्षा गणराया पूर्ण कर आणि या महाराष्ट्रावरची सगळी संकट दूर कर' अशा प्रकारची मनोभावे प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केली.

आज पासून मोठ्या उत्साहात जल्लोषात गणपतीचं आगमन झालेलं आहे. आणि म्हणून मी पुन्हा एकदा महाराष्ट्रातल्या सर्व नागरिकांना गणेश चतुर्थीच्या मनापासून शुभेच्छा देतो.गेल्या वर्षी आम्ही गणपती उत्सव निर्बंध मुक्त केले आणि सर्व सणांवर बंधन होती ती सगळी दूर केली. निर्बंध मुक्त वातावरणामध्ये गेल्या वर्षी देखील गणेश भक्तांनी मोठ्या आनंदात उत्साहात गणपती उत्सव साजरा केला. याही वर्षी प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत. निर्देश दिलेले आहेत जे मंडळ वर्षानुवर्ष नियमानुसार गणपती उत्सव साजरा करतात त्याने यावर्षी सरसकट पाच वर्षाची गणपती बसवण्याची परवानगी द्यावी सगळ्या गोष्टी आहेत त्याच्यामध्ये कुठल्याही शुल्क आकारू नये. निर्बंध मुक्त गणेशोत्सव साजरा करावा. कारण ही आपली संस्कृती आहे आपली परंपरा आहे. सण उत्सवामुळे सगळे लोक एकत्र येतात लोकमान्य टिळकांची भूमिका गणपती उत्सव शिवजयंती साजरा करण्याची ती सर्वांनी एकत्र आणण्यासाठी होती. आणि म्हणूनच सर्वांनी एकजुटीने एक दिलाने मनोभावे भक्ती भावे गणरायाची पूजा करावी. महाराष्ट्र सुजलाम सुफलाम व्हावा सुखी समृद्ध व्हावा हिच आमची अपेक्षा आहे. बाकी आमचा काही अजेंडा नाही. अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली तसेच सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

# शेती आणि शेतकरी पुन्हा कोरड्या दुष्काळाच्या संकटात

महाराष्ट्राच्या काही भागात सप्टेंबरच्या मध्यापर्यंत पावसाने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे पाणीटंचाई, सिंचन, जनावरांच्या चार्याचा प्रश्र्न गंभीर होणार आहे. खरीप हाताबाहेर गेला असून रब्बी हंगामाची आस लावून बसलेल्या शेतकर्यांना ठोस मदतीची गरज आहे. सरासरीपेक्षा खूपच कमी पाऊस झाल्याने शेतकरी आत्महत्येचा गंभीर प्रश्र्न पुन्हा डोके वर काढू शकतो. अशा परिस्थितीत सहकार संस्था, वित्तीय यंत्रणा आणि सरकारने मिळून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

ओल्या दुष्काळसदृष्य परिस्थितीत जनावरांच्या चार्याचा प्रश्र्न निर्माण होत नाही, मात्र कोरड्या दुष्काळात हा प्रश्र्न कमालीचा गंभीर होतो. त्यामुळे पुढच्या वर्षातल्या उन्हाळ्यात चारा छावण्यांचे नियोजन करण्याची गरज भासू लागली आहे. पावसाने अशीच ओढ दिल्यास स्थिती आणखी गंभीर होणार आहे. पुढील वर्षी लोकसभेच्या निवडणुकांची शक्यता असल्याने केंद्राकडून शेतकर्यांसाठी विविध योजनांची घोषणा केली जात असताना या योजनांची अंमलबजावणीची मोठी जबाबदारी स्थानिक जिल्हा प्रशासन आणि राज्य सरकारवर आहे.

जून, जुलै, ऑगस्टही सरला असून सप्टेंबरही सरत आला असताना महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यात पाण्याअभावी शेतकरी कमालीचा चिंतेत आहे. जमिनीने ओल धरलेली नाही, त्यामुळे दुबार पेरणीचं संकट ऑगस्ट महिन्यात होतं, मात्र त्यात दिलासाही होताच, ऑगस्टही कोरडा गेल्यामुळे पेरणीचा विषय जवळपास निकालात निघाला आहे. जुलै, ऑगस्टमध्ये किरकोळ सरी कोसळल्यावर मराठवाड्यातील काही शेतकर्यांनी धाडस करून पेरणी केली, परंतु आता उमललेली चिमुकली पिके माना टाकू लागली आहेत. अल्पभूधारक शेतकर्यांची स्थिती आणखी वाईट आहे. उस्मानाबाद, बीडसारख्या जिल्ह्यात बादलीतून पाण्याच्या थेंबा थेंबाने पिके वाचवण्याची कसरत शेतकर्यांना करावी लागत आहे. परतीच्या जोरदार पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास म्हणजेच वाढलेली पिके हिरावली जातात, मात्र या वर्षी पिके अंकुरण्याआधीच करपून गेली आहेत. दुबार पेरणीचा खर्च केल्यावर आता शेतकरी हतबल झाला आहे. पावसाने ओढ दिल्यामुळे मशागतीने उगवलेल्या पिकावर ट्रॅक्टर फिरवण्याची वेळ शेतकर्यावर आली आहे. मराठवाड्यात स्थिती भीषण आहे. भरून आलेलं आभाळ कोसळत नसल्यानं शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे. ऐन सप्टेंबरमध्ये उन्हाळ्याची स्थिती आहे. महाराष्ट्रातल्या १८ जिल्ह्यांवर दुष्काळाचं सावट आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सोयाबीन आणि मका पिवळा पडला आहे. पाण्याअभावी कणसात दाणे भरलेले नाहीत. सोयाबीनच्या शेंगाही भरलेल्या नाहीत. विहिरींनी तळ गाठलाय, तर हापसे, हातपंप, बोअर जड होऊ लागले आहेत. बोअरमधल्या पाण्यावर पीक जगवण्याचा आटोकाट प्रयत्न शेतकरी करत आहेत. यात शेती उत्पादनातल्या नफ्याचा विषय मागे पडून आता उसनवारी, पीककर्जाचा डोंगर कमी करण्यासाठीचा हतबल प्रयत्न शेतकर्यांकडून केला जात आहे. सरासरी एकरामागील उत्पन्न निम्म्यापेक्षा कमी येणार असल्याची चिंता शेतकर्यांना आहे. महाराष्ट्रातील बहुतेच जिल्हे पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. परतीचा पाऊस मुसळधार झाल्यावर पाणी झिरपल्यानंतर शेतकर्यांना रब्बीच्या हंगामाचा दिलासा मिळू शकतो, परंतु सध्यातरी तशी चिन्हे नाहीत. ऑगस्ट कोरडा गेल्यावर सप्टेंबरनेही शेतकर्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. यंदाचा सप्टेंबर महिना मागील १०० वर्षांतील सर्वाधिक कोरडा ठरला आहे. या महिन्यात सरासरीच्या ३६ टक्के कमी पाऊस झाला आहे. हे वजा प्रमाण गंभीर आहे. ऑगस्टमध्ये दरवर्षी साधारणपणे अडीचशे मिमी पाऊस असतो, मात्र यंदा हे प्रमाण १६० मिमी इतकं अत्यल्प आहे. यंदाच्या सप्टेंबरमध्ये उष्मा वाढणार असल्याने संकट गडद होत आहे. अर्धाअधिक सप्टेंबर संपल्यानंतरही पुरेसा पाऊस झालेला नाही. एल निनो वादळाने महाराष्ट्राचा या वर्षातला पाऊस हिरावून घेतला आहे. ही स्थिती पुढील वर्षाच्या सुरुवातीपर्यंत राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

महाराष्ट्रात मराठवाडा आणि पश्र्चिम महाराष्ट्राला दुष्काळासदृश्य स्थितीचा फटका बसणार आहे. १ जूनपासून ते ६ सप्टेंबरपर्यंत पावसाने कमालीचे निराश केले आहे. राज्यातील सांगली, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बुलडाणा, वाशिम, अकोला, अमरावती, गोंदिया, जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये दरवर्षीच्या तुलनेत यंदा खूपच कमी म्हणजे नगण्य स्वरुपाचा पाऊस झाला आहे. दरवर्षी जेवढा पाऊस सप्टेंबर महिन्यापर्यंत होतो त्या प्रमाणापेक्षा २० ते ६० टक्के पाऊस यंदा कमी झाला आहे. नाशिक मालेगावमध्ये ९५ टक्के पीक वाया गेलं असून शेतकरी पिकांवर रोटावेटर फिरवत आहेत. विदर्भ, कोकण, नाशिकमधील काही भाग आणि लातूर या जिल्ह्यात सरासरी इतका पाऊस आजपर्यंत झाला आहे, या पावसातही सातत्य न राहिल्यास हे जिल्हेही दुष्काळाच्या विळख्यात येणार आहेत. उरलेला महाराष्ट्र आधीच कमालीचा कोरडाठाक आहे. १० ते १५ टक्के उत्पन्न हातात येते का? अशी चिंता आहे. या वर्षीचा दुष्काळ जनावरांसाठी चिंतेचा आहे. दिवाळीनंतर डिसेंबरची थंडी संपल्यावर जससजा उन्हाळा जवळ येत जाईल, तशी स्थिती भीषण होणार आहे. जमिनीत पाणी मुरलेलं नसल्यानं उरलेल्या बोअरही कोरड्याठाक पडतील. नाशिक जिल्ह्यात ३ लाख हेक्टवर कांद्याची लागवड होते. यात खरीपाची लागवड ३० हजार हेक्टरवरची आहे. तर वाट पाहूनही उरलेल्या खरीपात ५५ हजार हेक्टरवर कांदा पेरला जातो. रब्बीमध्ये सव्वादोन लाख हेक्टरच्या जवळपास आहे. दुष्काळामुळे खरीप आणि रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. त्यामुळे येणार्या काळात कांदा रडवणारा आहे. कडबा नाही, चारा नाही, त्यामुळे शेतीपूरक उद्योगासमोरही चिंता आहे. पेरलेलं उगवलं नाही, पावसाची वाट पाहण्यात पावसाच्या परतीची वेळ आली असताना शेतकरी मोठ्या संकटात आहे. सिंचनाचं क्षेत्र आटलंय. गहू, हरभरा, भाजीपाला, कांदा, मका, कपाशी, फळफळावळ अशा सगळीच पिके धोक्यात आली आहेत. वर्ष २०२३ चा हंगाम हातून गेल्यात जमा आहे. पिकं गेली आता



जनावरं वाचवण्याचं आव्हान आहे. पाऊस नसल्यानं कडबा नाही, पाणी नाही, अशा परिस्थितीत जनावरांना जगवायचं कसं? असा प्रश्र्न येत्या काळात आणखी गंभीर होत जाणार आहे. शेतीसाठी टँकर मागवण्याची वेळ सप्टेंबर महिन्यातच शेतकर्यांवर आली आहे. यात पिण्याच्या पाण्याचे टँकरही आहेतच. मागील हंगामात उन्हाळी कांद्याला गारपीटीचा फटका बसला, त्यातून पेरणीचा खर्चही निघाला नाही. आता पावसाने ओढ दिल्यानं कांद्यानं शेतकर्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. पावसाने योग्य प्रमाण राखले असते, तर १० लाखांच्या कांदा उत्पादनात दीड ते दोन हजारांचा क्विंटलमागे भाव मिळाला असता आणि शेतकर्यांना २ ते ३ लाखांचा नफा झाला असता, मात्र असे झालेले नाही. गेल्या वर्षी पाऊस उत्तम झाला, मात्र ऐन वेळी परतीच्या आणि अवकाळीनं घात केला आणि हातातोंडाशी आलेलं पीक वाया गेलं. गेल्या वर्षातलं नुकसानीचं अनुदान अजून पोहचलेलं नाही, अशी खंत नाशिकमधील कांदा उत्पादक शेतकरी व्यक्त करत आहेत. हमी भाव, स्टोरेजचा विषय आहेच. सरकारने आताच चारा छावण्या सुरू करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. नाशिक जिल्ह्यातील ६ लाख ४१ हजार ३९५ हेक्टरवरील सर्वच पिकांना तडाखा बसला आहे. यात बाजरी, मका, भुईमूग, सोयाबीन, कपाशीचा समावेश आहे. उत्तर महाराष्ट्रातही जवळपास दीडशे गावे आणि साडेचारशे वाड्यांना पाणीटंचाईच्या झळा बसल्या आहेत. १३० टँकर्सनी पाणी पुरवठा केला जात आहे. मागील शंभर वर्षांतला सर्वाधिक कोरडा ऑगस्ट आणि सप्टेंबर म्हणून या २ महिन्यांची नोंद झाली आहे. नंदुरबार जिल्हा वगळून उरलेल्या जिल्ह्यांमध्ये टँकर्सच्या फेर्या वाढल्या आहेत. येथील ४ जिल्ह्यांच्या १८ तालुक्यांमध्ये ६०० गाव-पाड्यात साडेतीन लाख लोकसंख्येसाठी १३० टँकर चालवले जात आहेत. ही स्थिती सप्टेंबरची असल्याने आणि येत्या काळात आणखी भीषण होण्याच्या शक्यतेने शेतकरी ग्रामस्थ धास्तावले आहेत. यातून स्थलांतर वाढण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. अहमदनगर आणि नाशिकमध्ये पाण्याची कमतरता आहे. जवळपास ६० टँकर्सने पाणी पुरवठा केला जात आहे. जळगावमध्ये १५ टँकर्सने, तर धुळयात १ टँकर पाणी पुरवण्याचे काम करत आहे. झळ पोहचलेल्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी जलस्त्रोत, विहिरी ताब्यात घेतल्या आहेत.

नांदेडमध्ये पाऊस समाधानकारक आहे. मुंबई जिल्ह्यात पाऊस जोरदार आहे, परंतु या ठिकाणी पावसाची गरज नाही. मुंबईला पाणी पुरवठा करणार्या तानसा, भातसा, वैतरणा आदी शहापूरमधील धरणक्षेत्रातही अद्याप पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे मुंबईकरांनाही पुढच्या वर्षी उन्हाळ्यात पाणीकपातीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. उस्मानाबाद, सोलापूरमध्ये पावसाने कमालीची ओढ दिली आहे. यंदाच्या पावसाळ्यात नगण्य स्वरुपात पाऊस या दोन्ही जिल्ह्यात झाला आहे. तापमानात एक दोन डिग्रीची वाढ नोंदवली जात आहे. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यातील शेती जवळपास संकटात सापडली आहे. शेतकर्यांनी पेरणीची घाई करू नये, अशी सूचना जूनमध्ये पावसाने ओढ दिल्यानंतर देण्यात आली होती, परंतु आता सप्टेंबरही सरत आला तरी पावसाची कृपा झालेली नाही. केवळ १० ते १५ टक्के उत्पन्न हाती येणार आहे. या २ जिल्ह्यातील भागात पुरेशा पावसाची प्रतीक्षा करत रखडलेल्या पेरण्या झालेल्या नाहीत. ज्या ठिकाणी पेरण्या झाल्या आहेत, त्या जगवण्याचे आव्हान आहे. थोडा फार पाऊस झाल्यास जनावारांना उन्हाळ्यात चारा म्हणून त्याचा वापर होईल, या आशेवर पीक नाही, निदान जनावरांसाठी शेतीतील हिरवळ जपण्याच्या प्रयत्नांची पराकाष्टा शेतकरी करत आहेत. राज्य सरकारने पीक विमा योजना लागू केल्याने शेतकर्यांना दिलासा मिळाला आहे. या योजनेसाठी दीड कोटींहून जास्त शेतकर्यांनी नोंदण केली. या विमा योजनेतून शंभर लाखांहून अधिक हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाखाली आले आहे, परंतु पावसाने मोठी ओढ दिल्याने चिंता कमी झालेली नाही. पाऊसच झाला नसल्याने पीक विम्याचा लाभ धोक्यात येण्याची भीती शेतकर्यांना सतावत आहे. पूर, पावसाची अनियमितता, दुष्काळ यामुळे पिकांचे नुकसान झाल्यास उत्पादन घटल्याने शेतकर्यांना पीक विमा योजनेतून भरपाई दिली जाते, परंतु ही भरपाई वेळच्या वेळी मिळाल्यास शेतकर्यांना या संकटातून सावरता येईल, लालफितीत ही योजना अडकल्यास शेतकरी आणखी दुःखाच्या खाईत लोटला जाणार आहे. विम्याचा लाभ मिळवण्याचे निकष पूर्ण करण्याचे आव्हान शेतकर्यांसमोर राहणार आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा प्रशासनाने आत्मियतेने यातून मार्ग काढण्याची गरज निर्माण झाली आहे. दुष्काळाच्या संकटामुळे शेतकरी आत्महत्येसारख्या घटना वाढू नयेत यासाठी शेतकर्यांनीही आहे त्या परिस्थितीशी झगडून पुन्हा उभं राहायला हवं, अस्मानीच्या संकटात सुलतानीनं मदतीचा हात द्यायला हवा. तेलंगणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही रोख रक्कम शेतकर्यांना देण्याची मागणी वाढू शकते. खरीप हातचा गेला, निदान रब्बीसाठी तरी शेतकर्यांना दिलासा मिळायला हवा. केंद्र आणि राज्यांच्या कृषीविषयक योजना वेळच्या वेळी शेतकर्यांपर्यंत पोहचल्यास शेतकरी आणि शेतीला या दुष्काळाच्या संकटातून वाचवता येईल. त्यासाठी सरकारकडून इच्छाशक्ती आणि शेतकर्यांनी पुन्हा उभं राहाण्याचं धैर्य ठेवायला हवं.

**-संजय सोनवणे**

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य



# फ्लॅवनॉईड्सने परिपूर्ण आहार अनेक गंभीर रोगांपासून बचाव करण्यास उपयुक्त

आपल्या आहारामध्ये असलेल्या सर्व भाज्या आणि फळांमध्ये असलेल्या फायटोकेमिकल्सना 'फ्लॅवनॉईड्स' म्हणण्यात येते. शरीरातील इन्फ्लमेशन कमी करण्यासाठी आणि हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी फ्लॅवनॉईड्स अतिशय उपयुक्त असतात. म्हणूनच आपल्या दैनंदिन आहारामध्ये फ्लॅवनॉईड्सने परिपूर्ण ताज्या भाज्या आणि फळे नियमित असण्याबद्दल आहारतज्ज्ञ आग्रही असतात. याबद्दल संशोधन केले असता, फ्लॅवनॉईड्सने परिपूर्ण असलेला आहार अनेक गंभीर रोगांपासून बचाव करणारा ठरत असल्याचे निदान वैज्ञानिकांनी केले आहे. यामध्ये कर्करोगापासून हृद्यरोगापर्यंत अनेक रोगांचा समावेश आहे. याचा विशेष फायदा धूम्रपान आणि मद्यपानाचे व्यसन असणाऱ्यांसाठी आहे.

डेन्मार्कमध्ये एडिथ कोवान विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी स्थानिक नागरिकांच्या खानपानाच्या सवयींबाबत सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाचा कालावधी तब्बल तेवीस वर्षांचा असून, यामध्ये ५३ हजारांहून अधिक नागरिकांच्या आहाराचे अवलोकन केले गेले. या सर्वेक्षणामध्ये केल्या गेलेल्या निरीक्षणाच्या आधारे, ज्या व्यक्तीच्या आहारामध्ये फ्लॅवनॉईड्स युक्त पदार्थ अधिक प्रमाणांत होते, त्यांच्या बाबतीत कर्करोग किंवा हृदयाशी निगडीत रोग उद्भवण्याचा धोका पुष्कळ अंशी कमी असल्याचे म्हटले गेले आहे. तसेच या व्यक्तींच्या आहारामध्ये शाकाहारी पदार्थ अधिक असल्याचेही म्हटले गेले आहे.

वैज्ञानिकांच्या अनुसार ज्यांच्या आहारामध्ये दररोज ५०० मिलीग्राम पेक्षा अधिक फ्लॅवनॉईड्स आहेत, त्यांच्या बाबतीत कर्करोग आणि इतर गंभीर आजार उद्भवण्याची शक्यता कमी असते. धूम्रपान आणि मद्यपानाचे व्यसन असणाऱ्यांच्या बाबतीत कर्करोग, हृदयरोग उद्भवण्याची शक्यता अधिक असते. अशया व्यक्तींनी धूम्रपान किंवा मद्यपान करणे कमी करून आहारामध्ये फ्लॅवनॉईड्सने परिपूर्ण पदार्थ खाण्यास सुरुवात केल्यास त्यांचाही गंभीर रोगांपासून बचाव होऊ शकतो.

# शरीरात पोषक तत्वे जास्त झाली, तरी होते हानी, उद्भवू शकतात या आरोग्याच्या समस्या




नावाप्रमाणेच पोषक तत्वे पोषण प्रदान करतात. निरोगी राहण्यासाठी पोषक तत्वे खूप महत्वाची भूमिका बजावतात, म्हणून संतुलित आणि पोषणयुक्त आहार घेण्याचा सल्ला दिला जातो. जीवनसत्त्वे आणि खनिजांच्या कमतरतेमुळे, आरोग्याशी संबंधित अनेक लहान-मोठ्या समस्यांचा धोका असतो. या कारणास्तव, लोक त्यांच्या आहारात भरपूर पोषक तत्वे ठेवण्याचा प्रयत्न करतात. तथापि, कधीकधी या कारणामुळे, जीवनसत्त्वे आणि खनिजे देखील जास्त प्रमाणात वापरली जातात.

शरीरात पोषक तत्वांची कमतरता असल्यास अनेक आजारांचा धोका वाढतो, हे सर्वांनाच माहीत आहे, पण जर शरीरात पोषक तत्वांची कमतरता असेल, तर काय होईल याचा विचार करा. याचा आरोग्याला फायदा होईल की हानी? आम्ही तुम्हाला सांगतो की, अति प्रमाणात पोषक द्रव्ये आरोग्यालाही हानी पोहोचवू शकतात, तर चला जाणून घेऊया की पोषक त्यांच्या अतिरेक्तीमुळे काय प्रॉब्लेम येऊ शकतात.

### व्हिटॅमिन सी जास्त

व्हिटॅमिन सी हे एक पोषक तत्व आहे, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे मानले जाते. याचे सेवन केल्याने अनेक आजार टाळता येतात. हे दातांपासून त्वचेपर्यंत सर्वांसाठी फायदेशीर मानले गेले आहे. शरीरात व्हिटॅमिन सीचे प्रमाण जास्त झाल्यास उलट्या, मळमळ यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

### जास्त कॅल्शियम

हाडे मजबूत करण्यासाठी कॅल्शियम हे सर्वात महत्वाचे पोषक तत्व मानले जाते, परंतु शरीरात त्याचे प्रमाण जास्त असल्याने किडनीशी संबंधित समस्यांचा धोका वाढतो. याशिवाय बद्धकोष्ठता, उलट्या यासारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात.

### शरीरात जास्त आयरन

आयरन शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी योग्य राखण्यास मदत करते, या पोषक तत्वामुळे शरीर अशक्तपणाच्या धोक्यापासून सुरक्षित राहते. त्याचबरोबर आयरनचे प्रमाण वाढले, तर पोटदुखी, थकवा, हृदयाचे असामान्य ठोके यांसारख्या समस्या वाढू शकतात.

### जास्त प्रमाणात व्हिटॅमिन डी

व्हिटॅमिन डी हा हाडांसाठीही महत्त्वाचा घटक मानला जातो. शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यासही हे उपयुक्त आहे, परंतु जेव्हा शरीरात त्याचे प्रमाण वाढते, तेव्हा अशक्तपणा, वारंवार लघवी होणे, उलट्या होणे ही लक्षणे दिसू शकतात.

# आपल्या रोजच्या आहारातील आल्याचे आरोग्यास होणारे फायदे



आले जे की आपल्या चहामध्ये तसेच जेवणामध्ये सुद्धा चांगल्या प्रकारे चव येण्यासाठी वापरतो. भारतीय पदार्थात आले हे वापरले जाते जे की फक्त आले चव येण्यासाठी च न्हवे तर आयुर्वेद तसेच होमिओपॅथी मध्ये सुद्धा अगदी शास्त्रीय पद्धतीने आल्याचे आपल्या आरोग्यास चांगले महत्व सांगितले गेले आहे.आल्याचे आपल्या आरोग्यास मोठ्या प्रमाणात फायदे आहेत, जसे की आले हे एक विरोधी दाहक तसेच अँटी-ऑक्सिडंट या दोन्ही गुणधर्माचे एक पावरहाऊस आहे जे आपल्या शरीराच्या त्वचेसाठी, आपल्या केसांसाठी आणि शरीरातील अनेक अवयवांना सुद्धा लाभदायक आहे.

आज आपण आल्याचे उपयोग आपल्या शरीरासाठी काय आहेत ते पाहणार आहोत:

१. वजन कमी करण्यासाठी आल्याचा उपयोग – आले हे फक्त आपल्या जेवणाची चव उत्तम लागावी यासाठी नाही तर आपले वाढलेले जे वजन आहे ते वजन कमी करण्यासाठी सुद्धा आले हा चांगला पर्याय आहे. तुम्ही जर रोज आल्याचे पाणी म्हणजेच आले पाणी पीत असाल तर ते तुमच्या शरीरास खुप लाभदायक ठरणार आहे जे की त्यामधील सर्व पोषक द्रव्ये तुमच्या शरीरास भेटणार आहेत. या आले पाणी मुळे तुमचू भूक कमी होते म्हणजेच भूक लागत नाही आणि तुमचे वजन सुद्धा कमी होण्यास याची मदत होते.

२. त्वचेसाठी सुद्धा आले खूप लाभदायक – तुम्ही जर नियमितपणे आले पाणी पीत असाल तर तुमच्या त्वचेला याचा खूप फायदा होणार आहे. आल्यामध्ये अँटी-ऑक्सिडंट जिंजरॉल आहे जे आपल्या शरीरात जे मुक्त राडीकल्स असतात त्या सोबत लढते आणि यामुळे आपली त्वचा फक्त निरोगी च राहत नाही तर आपल्या त्वचेवर चांगल्या प्रकारचा चमकदारपणा सुद्धा येतो. आल्यामध्ये जे दाहक गुणधर्म आहेत ते आपल्या शरीरात असणाऱ्या संसर्गाशी लढतात आणि त्यामुळे आपली त्वचा सुद्धा योग्य आणि निरोगी प्रकारे राहते.

३. मासिक पाळी च्या वेळी त्रास कमी होणे – मासिक पाळी दरम्यान महिला वर्गाला खूप त्रास होतो त्यावेळी त्याने आले पाणी घेतले तर उत्तमच आहे. एका संशोधनानुसार असे समोर आले आहे की मासिक पाळी दरम्यान महिलांना ज्या वेदना तसेच पेटके येतात ते कमी करण्यास आले पाणी ची मदत होते त्यामुळे मासिक पाळी दरम्यान आले पाणी तुम्ही घ्या.

४. शरीरातील कॅलेंस्ट्रॉल ची पातळी कमी प्रमाणात – आपल्या शरीरात जे खराब प्रकारचे कॅलेंस्ट्रॉल असते त्याची पातळी कमी करण्यास आले पाणी उपयुक्त ठरते. आले पाण्यामुळे हृदयविकार तसेच स्ट्रोक सारख्या समस्यांचा धोका कमी होतो.आले पाणी मध्ये अनेक प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट, आल्याच्या पाण्यामध्ये अँटीऑक्सिडंट असल्याने आपल्या शरीरात जे मुक्त राडीकल्स असतात त्याचा सामना करते आणि हृदयविकार असो किंवा कर्करोग तसेच मधुमेह याचा धोका कमी होतो. तसेच आले पाणी मध्ये पोटॅशियम चे प्रमाण देखील असते आणि पोटॅशियम आपल्या हृदयासाठी तसेच हाडांच्या स्नायूसाठी उपयुक्त ठरते.

५. आले पाणी मध्ये अनेक प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट:

आल्याच्या पाण्यामध्ये अँटीऑक्सिडंट असल्याने आपल्या शरीरात जे मुक्त राडीकल्स असतात त्याचा सामना करते आणि हृदयविकार असो किंवा कर्करोग तसेच मधुमेह याचा धोका कमी होतो. तसेच आले पाणी मध्ये पोटॅशियम चे प्रमाण देखील असते आणि पोटॅशियम आपल्या हृदयासाठी तसेच हाडांच्या स्नायूसाठी उपयुक्त ठरते.

आले पाणी कसे तयार करावे–


सामग्री:

१. ताजे आले.
२. पाणी ३ कप.
३. मध १ चमचा.

कृती:

आले किसून द्या आणि उकळलेल्या पाण्यात ते टाकावे, थोड्या वेळ थंड करण्यास ठेवा आणि त्यामध्ये १ चमचा मध टाका. आले पाणी तयार झाले की तुम्ही ते पिऊ शकता.

# जाणून घ्या गोमुत्राचे अद्भुत फायदे



गोमुत्रात पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटयाश, अमोनिया, क्रिटेनिन, नायट्रोजन, सोडियम, कार्बोलिक ॲसिड्स, लॅक्टोज, पाचकरस, हार्मोन्स व अनेक खनिजद्रव्यं असतात, जी मनुष्याची शरीरशुद्धि व पोषण करतात.

१. दातांच्या रोगात दात स्वच्छ करून, गोमूत्र थोडावेळ तोंडात धरुन ठेवल्याने दंतरोग हमखास बरे होतात. हे त्यातल्या कार्बोलिक ॲसिडमुळे होते.

२. लहान मुलांची हाडे कमजोर असल्यास, सकाळी अनोशापोटी, नियमित ५० मिली गोमूत्र घेतल्याने काही दिवसात हाडे बळकट होतात.

३. गोमुत्रातील लॅक्टोज मुले व वृद्ध यांना प्रोटीन्स देते.

४. गोमूत्र, आपल्या हृदयाच्या पेशींना टोन अप करते.

५. गोमूत्र, वृद्धावस्थामधे मेंदूला दुर्बल होऊ देत नाही.

६. गोमूत्र, महिलांच्या हिस्टिरिया जनिक मानसिक रोगांना रोखते.

७. सिफलिस, गनेरियासारख्या यौन रोगांना गोमूत्र नष्ट करते. ८. उपाशिपोटि अर्धा कप गोमूत्र नियमित घेतल्याने, सर्व यौनरोग हमखास बरे होतात.

९. महत्वाची बाब म्हणजे गोमुत्राने बरा झालेला आजार पुन्हा लवकर होत नाही, हे गोमुत्राचे वैशिष्ट्य आहे.

१०. गोमुत्रातील, कार्बोलिक ॲसिड हाडे, मज्जा व विर्याला शुद्ध करते.

११. नियमित गोमुत्र प्यायल्याने, एक महिन्यात २ ते ३ किलो अतिरिक्त वजन कमी होते.

१२. गोमुत्र, त्वचारोगांसाठी सर्वोत्तम औषध आहे.

गोमुत्रात पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटयाश, अमोनिया, क्रिटेनिन, नायट्रोजन, सोडियम, कार्बोलिक ॲसिड्स, लॅक्टोज, पाचकरस, हार्मोन्स व अनेक खनिजद्रव्यं असतात, जी मनुष्याची शरीरशुद्धि व पोषण करतात.

१. दातांच्या रोगात दात स्वच्छ करून, गोमूत्र थोडावेळ तोंडात धरुन ठेवल्याने दंतरोग हमखास बरे होतात. हे त्यातल्या कार्बोलिक ॲसिडमुळे होते.

२. लहान मुलांची हाडे कमजोर असल्यास, सकाळी अनोशापोटी, नियमित ५० मिली गोमूत्र घेतल्याने काही दिवसात हाडे बळकट होतात.

३. गोमुत्रातील लॅक्टोज मुले व वृद्ध यांना प्रोटीन्स देते.

४. गोमूत्र, आपल्या हृदयाच्या पेशींना टोन अप करते.

५. गोमूत्र, वृद्धावस्थामधे मेंदूला दुर्बल होऊ देत नाही.

६. गोमूत्र, महिलांच्या हिस्टिरिया जनिक मानसिक रोगांना रोखते.

७. सिफलिस, गनेरियासारख्या यौन रोगांना गोमूत्र नष्ट करते. ८. उपाशिपोटि अर्धा कप गोमूत्र नियमित घेतल्याने, सर्व यौनरोग हमखास बरे होतात.

९. महत्वाची बाब म्हणजे गोमुत्राने बरा झालेला आजार पुन्हा लवकर होत नाही, हे गोमुत्राचे वैशिष्ट्य आहे.

१०. गोमुत्रातील, कार्बोलिक ॲसिड हाडे, मज्जा व विर्याला शुद्ध करते.

११. नियमित गोमुत्र प्यायल्याने, एक महिन्यात २ ते ३ किलो अतिरिक्त वजन कमी होते.

१२. गोमुत्र, त्वचारोगांसाठी सर्वोत्तम औषध आहे.

२८. संधिवात, हाडे ठिसुळ होणे, रुमेटिका फिव्हर आणि अर्थ्रायटिसमधे सर्व औषधे निष्फळ ठरतात. अशा ८० प्रकारच्या वातरोगांमधे गोमूत्र एकमात्र औषध आहे. यासाठी अर्धा कप गोमुत्रात २ ग्रॅम शुद्ध शिलाजीत, १ चमचा सुंठचूर्ण, शुद्ध गुग्गुळ किंवा महायोगराज गुग्गुळच्या २ गोळ्या मिसळून पाजा. हाडांचे आजार बरे होतात.

२९. शौचाला साफ़ न होण्याने सर्व रोगांना निमंत्रण मिळते. गोमूत्र, लघवीचे आजार, शौच म्हणजे मलावरोध दोघांना मोकळे करते. अशा वेळेला गोमूत्र दोन्ही वेळा ५०-५० मिली घ्यावे.

३०. गोमुत्रात एरंड तेल अथवा बादाम रोगन १ चमचा मिसळून दिल्याने जुलाब साफ़ होतात.

३१. लहान मुलांना शौचाचा त्रास होत असल्यास गोमुत्रात २ चमचे मध मिसळून पाजावे.

३२. गाईच्या दुधात २ चमचे तूप मिसळून पाजल्याने गर्भवती महिलांचा मलावरोध नाहिसा होतो.

३३. डायबिटिसमधे गोमूत्र फार उपयुक्त आहे. गोमूत्र डायबिटीस कंट्रोलमधे ठेवते.

३४. यकृतरोग, काविळ, जॉण्डिस या रोगांमधे गोमूत्र व पुनर्नवा मंडूर घ्यावे. कोरफडीच्या ३० मिली रसात ५० मिली गोमूत्र मिसळून प्यायल्याने पचनसंस्थेचे सर्व अवयव रोग मुक्त होतात.

३५. २ ग्रॅम ओवाचूर्ण किंवा जायफळ वाटून गोमुत्रात मिसळून पाजल्याने पोटाचे दुखणे, मुरडा, आव, भूक न लागणे असे आजार ठीक होतात.

३६. मुळव्याधीच्या कोणत्याही तक्रारीमधे ५० ते १०० मिली गोमूत्र प्यायल्याने फायदा होतो.

३७. खरुज, एक्झिमा, पांढरे डाग, कुष्ठरोग यामधे गोमुत्रात गुळवेलीचा रस मिसळून सकाळ संध्याकाळ प्यायल्याने असे आजार त्वरित बरे होतात. त्वचेवर बटमोगऱ्याच्या तेलात गोमूत्र मिसळून मालीश करावे.

३८. हृदयविकारामधे गोमूत्र प्यायल्याने, रक्तातील गुठळया विरघळतात.

३९. हाय ब्लडप्रेशर व लो ब्लडप्रेशरमधे गोमुत्रातील लॅक्टोज, जबरदस्त परिणाम करते. हृदयरोगात गोमूत्र उत्तम टॉनिक आहे. ४०. गोमूत्र, शिरा व धमन्यांमधे कोलेस्टेरॉल साठू देत नाही.

४१. किडनी काम करत नसेल तर गोमूत्र घ्या.

४२. प्रोस्टेट ग्रन्थी वाढलेली असेल तर गोमूत्र घ्या.

४३. किडनी व प्रोस्टेट ग्रन्थिंचे कार्य गोमुत्रामुळे सुधारते.

४४. गोमुत्र व तुळस सर्व वास्तुदोष घालवतात.

गोमुत्रासारखे दूसरे कुठलेही औषध नाही, जे लहान मुलांपासून वृद्धांपर्यन्त, कोणत्याही रोगांशिवायही नियमित घेऊ शकता.

गोमुत्र नेहमी ८ पदरी सुती कापडाने गाळून घ्या. गोमूत्रात मध घालून ठेवल्याने ते जास्त दिवस टिकून रहते. एक महिन्याने व्यायला येणाऱ्या आणि व्यायल्यानंतर १ महिना गोमुत्र घेऊ नये. आजारी गाईचे गोमूत्र घेऊ नये. ताजे गोमुत्र मिळत नसल्यास, गोधनअर्क घ्यावा व त्यासोबत गोमुत्र वटी जरूर घ्यावी.

# जर आपण देखील दररोज अंडी खात असाल तर या गोष्टींची काळजी घ्या



अंडी खाणं आरोग्यासाठी चांगले मानले आहे.जर आपण दररोज अंडी खात असाल तर काही गोष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.अंडी प्रथिनांनी समृद्ध असते.म्हणून अंडी न्याहारीचे पर्यायी मानले जाते.काही लोक न्याहारीत दररोज अंडी खातात.परंतु अंडी खाताना काही गोष्टींची काळजी घेणं महत्त्वाचे आहे.चला जाणून घेऊ या.

आपल्याला माहित आहे की अंडीमध्ये अमिनो ऍसिड मुबलक प्रमाणात आढळतात .हे आपल्या शरीराच्या सर्व गरजा पूर्ण करतात.या मध्ये व्हिटॅमिन ए,व्हिटॅमिन बी,बी १२ व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन ई मुबलक प्रमाणात आढळतं.या शिवाय हे फॉलेट सेलेनियम आणि अनेक खनिज लवणांचे स्रोत आहे.

दररोज अंडी खाताना या गोष्टी लक्षात ठेवा–

जर आपण दररोज अंडी खात असाल तर आपण अंडी एका दिवसाच्या अंतराने खाण्यास सुरुवात करा. कारण उन्हाळ्यात अंडी पचवण्यात अडचण येऊ शकते.याच बरोबर आपल्याला पोटाशी संबंधित समस्या देखील होऊ शकते,या कारणास्तव आपण दररोज अंडी खाणे टाळावे.

अंडी खाताना, हे देखील लक्षात ठेवा की फक्त एकच अंडी खा आणि त्याचे सातत्य ठेवा. दररोज २ अंडी खाणे शरीराला हानी पोहोचवू शकते.

अंडी शरीराला पोषण आणि ऊर्जा प्रदान करतात, परंतु उच्च प्रथिने आणि समृद्ध पोषक घटकाने परिपूर्ण आहार पचवण्यासाठी,आपली रोगप्रतिकारक शक्ती निरोगी असणे देखील आवश्यक आहे, म्हणून दिवसातून फक्त एकच अंडी खा.

जर आपण दिवसात व्यायाम किंवा योगा करत नसाल किंवा कोणतेही धावण्याचे काम करत नसाल तर आपण दररोज अंडी खाणे टाळावे.असं केल्याने आपल्या शरीराला नुकसान होऊ शकतं.

# सर्दी पडसाचा त्रास असल्यास हे ५ घरगुती उपाय अवलंबवा

बदलत्या हंगामात, आपण अद्याप सर्दी आणि खोकल्यापासून वाचू शकत नाही. ही परिस्थिती खूप वेदनादायक असू शकते. शरीर दुखणे, ताप येणे, थंडी वाजणे आणि नाक वाहणे हे कोणालाही दुःखी करण्यासाठी पुरेसे आहे.

या समस्यांपासून त्वरित आराम देण्यासाठी, आम्ही काही खास घरगुती उपचार (सर्दी आणि खोकल्याचे घरगुती उपचार) सांगत आहोत. या घरगुती उपायांबद्दल जाणून घेऊया. सर्दीशी लढण्यासाठी आपण या ५ घरगुती उपायांचा अवलंब करू शकता.

१. मधाचा चहा – खोकल्यासाठी एक लोकप्रिय घरगुती उपाय म्हणजे कोमट पाण्यात मध मिसळणे. काही संशोधनानुसार, मध खोकल्यापासून आराम देऊ

शकते. मुलांमध्ये रात्रीच्या खोकल्याच्या उपचारांवर एक अभ्यास करण्यात आला. यानुसार, गडद रंगाच्या मधाची तुलना खोकला दाबणाऱ्या औषधांशी केली गेली. संशोधकांनी नोंदवले की मधाने खोकल्यापासून सर्वात जास्त आराम दिला, त्यानंतर औषधाने. खोकल्याच्या उपचारात प्रभावी, हा मधाचा चहा बनवण्यासाठी २ चमचे मध कोमट पाण्यात किंवा कोणत्याही हर्बल चहामध्ये मिसळा. हे मिश्रण दिवसातून एकदा किंवा दोनदा प्या. १ वर्षाखालील मुलांना मध देऊ नका.



२. मीठ-पाण्याचे गुळने करा– घसा खवखवणे आणि ओल्या खोकल्याच्या उपचारांसाठी हा सोपा उपाय सर्वात प्रभावी आहे. मीठाचे पाणी घशाच्या मागील भागातील कफ आणि श्र्लेष्मा कमी करते, ज्यामुळे खोकला बरा होतो.एक कप कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ विरघळेपर्यंत मिसळा. गुळने करण्यासाठी पाणी वापरण्यापूर्वी किंचित थंड होऊ द्या. मिश्रण थुंकण्यापूर्वी काही क्षण घशाच्या मागच्या बाजूला ठेवा. खोकला बरा होईपर्यंत दिवसातून अनेक वेळा मीठ पाण्याने गार्गल करा. लहान मुलांना मिठाचे पाणी देणे टाळा कारण ते योग्यरित्या गुळने करू शकत नाहीत आणि त्यांच्यासाठी मिठाचे पाणी गिळणे धोकादायक ठरू शकते.

३. ओव्याचे फुले – ओव्याचा वापर खाण्यात आणि उपचारात प्रभावी आहे.हे खोकला, घसा खवखवणे, ब्राँकायटिस आणि पाचक समस्यांवर एक सामान्य उपाय आहे. एका अभ्यासात असे आढळून आले आहे की ओवा आणिओव्याची पाने असलेले खोकल्याचे सिरप तीव्र ब्राँकायटिस असलेल्या लोकांमध्ये खोकल्यात लवकर आराम देते. ओव्याच्या वनस्पतीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स त्याच्या फायद्यांसाठी जबाबदार असू शकतात. ओव्याच्या फुलांचा वापर करून खोकल्याचा उपचार करण्यासाठी, एक कप गरम पाण्यात २ चमचे ओवा घालून ओवाचा चहा बनवा. चहा बनवल्यानंतर, १० मिनिटे तसेच पडू द्या आणि नंतर ते गाळून प्या.

४. आलं- आलं कोरडा खोकला किंवा दम्याचा खोकला कमी करू शकते, कारण त्यात अँटी इंफ्लिमेंट्री गुणधर्म आहेत. हे वेदना कमी करू शकते. एका अभ्यासात असे सुचवले आहे की आल्यामध्ये काही अँटी इंफ्लिमेंट्री गुणधर्म आहेत जे घसाला आराम देऊ शकतात, ज्यामुळे खोकला कमी होतो. संशोधकांनी प्रामुख्याने मानवी ऊतक आणि प्राण्यांवर आल्याच्या परिणामांचा अभ्यास केला आहे. हे तयार करण्यासाठी, एका कप गरम पाण्यात २०-४० ग्रॅम (ग्रॅम) ताजे आल्याचे तुकडे घालून उकळून घ्या आणि आल्याचा चहा बनवा. पिण्यापूर्वी काही मिनिटे सोडा. चव सुधारण्यासाठी आणि खोकला शांत करण्यासाठी मध किंवा लिंबाचा रस घाला. लक्षात ठेवा की आल्याचा चहा काही प्रकरणांमध्ये पोटदुखी किंवा छातीत जळजळ करू शकतो.

५. हळदीचे दूध –हळद हा जवळजवळ सर्व भारतीय स्वयंपाकघरांमध्ये आढळणारा एक आवश्यक घटक आहे. हळदीमध्ये एक मजबूत अँटिऑक्सिडेंट असतो जो अनेक आरोग्य समस्यांवर उपचार करण्यास मदत करतो. कोमट दुधात हळद मिसळून पिणे हा सर्दी आणि खोकल्याशी लढण्याचा एक लोकप्रिय आणि प्रभावी मार्ग आहे. झोपेच्या आधी एक ग्लास कोमट हळद दुध प्यायल्याने सर्दी आणि खोकल्यापासून लवकर बरे होण्यास मदत होते.

## जिल्ह्यात १९ सप्टेंबर रोजी मद्यविक्री बंद; २५ सप्टेंबरला उदगीर नगरपरिषद हद्दीतील मद्यविक्री बंद

लातूर : जिल्ह्यात १९ सप्टेंबर, २०२३ ते २८ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होत आहे. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी १९ सप्टेंबर, २०२३ रोजी संपूर्ण लातूर जिल्ह्यातील, तसेच २५ सप्टेंबर, २०२३ रोजी उदगीर नगर परिषद हद्दीतील सर्व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करण्यास कुचराई करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुध्द मुंबई दारुबंदी कायदा १९४९ व अनषंगिक नियमांच्या आधारे कडक कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशात नमूद केले आहे.

## दयानंद वाणिज्यमध्ये एन.सी.सी. रँक वितरण समारंभ संपन्न

लातूर : येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय छात्र सेना विभागातील कॅडेटचा एन.सी.सी. रँक वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला.सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांची उपस्थिती होती.सुरुवातीला असोसिएट ए.सी.सी. ऑफिसर लेफ्टनंट डॉ. साईनाथ उमाटे यांनी कॅडेट ला रँक देण्याचा मागचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की कॅडेट्सना प्रोत्साहन देण्यासाठी,जबाबदारीची भावना राखण्यासाठी,कॅडेट्सना प्रवृत्त करणे आणि त्यांची मेहनत आणि निष्ठा ओळखणे आदी. याप्रसंगी रितेश चौगुले- सिनिअर अंडर ऑफिसर, गोविंद मोरे व सृष्टी राजपूत - ज्युनियर अंडर ऑफिसर, बिरादार म्हाळसाकांत - सार्जंट, जगदीश पांचाळ -कॉर्पोरल, श्रीशा कांबळे - लान्स कॉर्पोरल आदी अनुक्रमे रँक कॅडेट ला प्रं. प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या हस्ते देण्यात आली.यावेळी डॉ. पवार यांनी कॅडेट चे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.यावेळी उपप्राचार्य डॉ.गणेश लहाने , बीसीए विभागप्रमुख प्रा.शशिकांत स्वामी व सर्व एन.सी.सी कॅडेट ची उपस्थिती होती.

# संत गाडगेबाबा स्वच्छता उत्सवाचे आयोजन

लातूर : येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयात २०१८ ते २०१९ या वर्षापासून संत गाडगेबाबा स्वच्छता उत्सवाचे शानदार आयोजन केले जाते. या उत्सव सोहळ्यात आजी-माजी विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वच्छतादूत स्वयंसेवक सर्वांच्या सहभागातून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याबरोबरच सामाजिक प्रबोधन व बांधिलकी वैचारिक विचारनिष्ठ आदी संदर्भात बौद्धिक विचार मंथनही केले जाते.

आज दि. १८ सप्टेंबर रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्याबरोबरच या उत्सवाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्याचे आयोजक म्हणून प्रा. डॉ.वेदप्रकाश मलवाडे, प्रा.अनिता गायकवाड, प्रा. संजय मोरे कार्यरत असणार आहेत. दि. २० सप्टेंबर रोजी अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग व पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, बाबा हलकुडे हे मार्गदर्शन करणार आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळ व हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्याचे महत्त्व युवकांना कळावे म्हणून पोस्टर प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात आले आहे. ही जबाबदारी प्रा. डॉ.बाळू कांबळे, डॉ. विजयकुमार मेकेवाड, प्रा. सौ. सीमा पाटील हे सांभाळणार आहेत. दि.२१ सप्टेंबर रोजी युवकांना आपले संविधान व कायदा या संदर्भात माहिती व्हावी म्हणून मा. ड. मादेवार सुरज पांडुरंग पुणे हे मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमाचे आयोजन प्रा.डॉ.पांडुरंग शितोळे, डॉ. सिद्धेश्वर मुचाटे, डॉ. महेश कुंभार हे करणार आहेत. दि. २२, २३, २४ सप्टेंबर रोजी युवकांच्या कलागुणांना वाव मिळावा, युवकांमधून विचारवंत व कलावंत निर्माण व्हावेत या भूमिकेतून निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पोस्टर स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेसाठी संत गाडगेबाबा यांचे विचार व कार्य हा विषय देण्यात आला आहे. चित्रकला स्पर्धा ही पर्यावरण व वृक्षसंवर्धन या विषयावर घेण्यात येणार आहे.


याबरोबरच सुभाषित, लोक म्हणी या विषयावरील घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.दिनांक २५ सप्टेंबर रोजी समुपदेशन या विषयावर मौलिक विचार मानसशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका उर्मिला भांदरगे मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानाचे आयोजन प्रा.डॉ.सविता किर्ते, डॉ. कुमार बनसोडे, प्रा. धनराज शिंदे यांनी केले आहे. दि. २८ सप्टेंबर रोजी आपले आरोग्य धनसंपदा व स्वच्छता या विषयावर नामवंत डॉ.लक्ष्मण देशमुख हे व्याख्यान देणार आहेत. या व्याख्यानाचे आयोजन प्रा.डॉ. माधव पलमंटे, प्रा.गुरुनाथ देशमुख, प्रा. सविता यादव यांनी केले आहे. याबरोबरच मनोरंजन उद्बोधन व प्रबोधनासाठी सुप्रसिद्ध नामवंत कवी मा.श्री नरसिंग इंगळे यांचे काव्यवाचन व गायनांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा.शंकर येडले, प्रा. डॉ. सुरेखा बनकर, प्रा.मोहन बलगोरे यांनी केले आहे. समारोप समारंभाचे आयोजन दि. २८ सप्टेंबर रोजी करण्यात आले असून, प्रसिद्ध वक्ते प्राचार्य डॉ.हरिदास फेरे हे समारोप समारंभासाठी येत आहेत. समारोप समारंभाचे आयोजन प्रा.डॉ.उत्तम गायकवाड, प्रा. संजयादेवी पवार, प्रा.बापू गायकवाड यांनी केले आहे. एकूणच संत गाडगेबाबा स्वच्छता उत्सवाचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. शंकर येडले, प्रा. दादासाहेब लोंढे यांनी नियोजन केल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील यांनी सांगितली.

# भारतीय संघाची झाली घोषणा; फिरकीपटू अश्विनचे पुनरागमन

नवी दिल्ली : आगामी विश्र्वचषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने महत्वाची मानली जाणारी भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया या संघातील एकदिवशीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये भारताचा फिरकीपटू रविचंद्रन अश्र्विनचे पुनरागमन झाले आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यांसाठी वेगळा संघ निवडला आहे, तर तिसऱ्या एकदिवसीय सामन्यासाठी निवडलेल्या संघात विश्र्वचषक संघात असलेल्या खेळाडूंनाच संधी देण्यात आली आहे. मात्र, रविचंद्रन अश्र्विन तीनही एकदिवसीय सामन्यांसाठी संघाचा भाग आहे. प्रदीर्घ कालावधीनंतर तो वनडे संघात परतला आहे. त्याने आपला शेवटचा एकदिवसीय सामना जानेवारी २०२२ मध्ये खेळला होता. जून २०१७ मध्ये भारतीय एकदिवसीय संघातून वगळल्यानंतर अश्र्विनने गेल्या सहा वर्षांत केवळ दोन एकदिवसीय सामने खेळले आहेत. अक्षर पटेल तिसऱ्या एकदिवसीय सामन्यासाठी संघात आहे, पण त्याच्या फिटनेसवर संशय आहे. जर तो तंदुरुस्त नसेल तर अश्र्विन किंवा वॉशिंग्टन सुंदरला विश्र्वचषक संघात संधी मिळू शकते.

# अमृता फडणवीसांना ब्लॅकमेल करणाऱ्या अनिल जयसिंघानीला जामीन मंजूर



मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना लाच देऊन अडकवण्याचा प्रयत्न करणारा बुकी अनिल जयसिंघानी याला मुंबई विशेष सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. जयसिघांनी या प्रकरणात २० मार्चपासून अटकेत होता. अनिल जयसिंघांनी याला खंडणी प्रकरणी भ्रष्टाचार विरोधी कायद्यान्वये अटक करण्यात आली होती. मुंबई सत्र न्यायालयाने ५० हजारांचा सशर्त जामीन मंजूर केला आहे.

विशेष सत्र न्यायालयाने एसीबीच्यावतीनं अजय मिसार यांनी अनिल जयसिंघानींच्या जामीनाला विरोध केला. तर जयसिंघानीच्यावतीनं सुदीप पस्बोला यांनी युक्तिवाद केला. न्यायाधीशांनी आज अनिल जयसिंघानीला जामीन मंजूर केला. अनिल जयसिंघांनीला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचक्यावर सोडण्यात यावं, असे आदेश न्यायालयानं तापस अधिकारी रवी सरदेसाई यांनी दिले. कोर्टात दररोज हजेरी लावणे, साक्षीदारांनी न धमकावणे, अशा अटींवर जामीन मंजूर करण्यात आला आहे.

अनिल जयसिंघानीनं त्याच्या अटकेविरोधात मुंबई हायकोर्टात धाव घेतली होती. मात्र, पोलिसांनी केलेली अटकेची कारवाई योग्य असल्याचं म्हणत मुंबई हायकोर्टानं ती याचिका फेटाळली होती. हे प्रकरण समोर आल्यानंतर राज्यभरात खळबळ उडाली होती.

क्रिकेट बुकी अनिल जयसिंघानी याचे १५ हजार कोटींचे मॅच फिक्सिंग नेटवर्क पोलीस तपासात उघड झालं आहे. त्याच्यावर ईडीने मनी लॉड्रिंगप्रकरणी गुन्हा दाखल करून कारवाई केली आहे. अमृता फडणवीस यांना लाच देण्याचा प्रयत्न आणि ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न अनिल जयसिंघांनी यांची मुलगी अनिक्षा जयसिंघानी हिने केला होता, असा तिच्यावर आरोप आहे. अमृता फडणवीस यांनी या प्रकरणी पोलिसांत तक्रार दिली आणि त्यानंतर तपास सुरू झाला आणि जयसिंघानी याला अटक करण्यात आली होती. सर्वात आधी अनिक्षाला अटक करण्यात आली त्यानंतर अनिल जयसिंघानी याला गुजरातमधून अटक करण्यात आली होती.

# महानगरपालिका कर्मचारी गणेश मंडळ कार्यकारिणीची निवड

लातूर : लातूर शहर महानगरपालिका कर्मचारी गणेश मंडळ स्थापनेसंदर्भात बैठक होऊन सर्वानुमते यावर्षी महिला पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. मंडळाच्या अध्यक्षपदी श्रीमती रंदावनी पवार,उपाध्यक्ष म्हणून श्रीमती चंद्रप्रभा औटी,श्रीमती.विजया बिडवे यांच्यासह व्यंकट हिरास यांची निवड करण्यात आली. सचिवपदी श्रीमती अनुराधा देवकते,सहसचिव श्रीमती राधिका गडदे,श्रीमती वैशाली पाचंगे व चंद्रकांत बावगे ,कोषाध्यक्ष श्रीमती प्रभावती पाटील, सहकोषाध्यक्ष अभिषेक माळवे यांचा कार्यकारिणीत समावेश आहे.मंडळात सदस्य म्हणून श्रीमती नसरीन शेख,श्रीमती विजया सोमवंशी,श्रीमती सुनिता पोटे,श्रीमती मंगलबाई पवार,श्रीमती शोभाताई क्षिरसागर.

प्रमुख सल्लागार म्हणून रमाकांत पिडगे,नवनाथ केंद्रे, नंदकिशोर तापडीया ,खदीर शेख,विजय राजुरे,पांडुरंग किसवे,पवन सुरवसे, कलीम शेख साहेब, समाधान सूर्यवंशी, संतोष लाडलापुरे यांचा कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे.

मंडळाचे प्रसिध्दी प्रमुख म्हणून रुक्मानंद वडगावे,बालाजी शिंदे,रवी कांबळे,महादेव साठे,लक्ष्मण जाधव.

भोजन समिती प्रमुख म्हणून दिपक पवार, महेश शर्मा, बंडू आर्वीकर, कैलास मुद्दे, फजल शेख, स्टेज व मंडप समिती प्रमुखपदी जरिचंद ताकपिरे, प्रदीप जोगदंड, अरीफ शेख, संतोष फिस्के, विजय शेटे यांचा कार्यकारिणीत समावेश करण्यात आला आहे.

मंडळाच्या वतीने गणेशोत्सवा दरम्यान विविध समाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न

लातूर : श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वर्धापन दिन आणि मराठी पत्रकार, समाज सुधारक व संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे पुढारी केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती उत्साहात संपन्न झाली.

यावेळी उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. एन.जी.माळी, प्रा. बी. एस. पणूरे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या शुभ हस्ते राष्ट्रध्वज आणि विद्यापीठध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा. विश्र्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार, डॉ. गिता गिरवलकर आणि विद्यार्थिनींनी महाराष्ट्र आणि विद्यापीठ गीत सादर केले.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी उपस्थित सर्वांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमांमध्ये इंग्रजी, मराठी, भौतिकशास्त्र, इतिहास आणि युवती मंडळ विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे विमोचन करण्यात आले.

यावेळी शुभेच्छापर मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, १७ सप्टेंबर हा मराठवाड्यातील जनसामान्यांसाठी नव चैतन्याचा दिवस आहे. आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ला स्वातंत्र्य मिळाले. मात्र १७ सप्टेंबर १९४८ रोजी आपण हैदराबाद संस्थानातून मुक्त झालो. आज त्याला ७५ वर्ष पूर्ण होत आहे. हैदराबाद मुक्तिसंग्राम शालेय विद्यार्थ्यांना माहिती व्हावा या उद्देशाने नूतन जिल्हाधिकारी मा. वैशाली ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्ह्यामध्ये हैदराबाद मुक्तिसंग्राम व्याख्यानमाला अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने संपन्न केली त्याबद्दल त्यांनी त्यांचेही अभिनंदन केले.

## लातूर जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत पोहचणार 'कथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' पुस्तिकेचे प्रकाशन

लातूर : मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना या लढ्याचा इतिहास समजावा, यासाठी लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'कथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची' ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन रविवारी हुतात्मा स्मारक येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले.

ज्येष्ठ साहित्यिक तथा माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, इतिहासकार प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, माहिती उपसंचालक डॉ. सुरेखा मुळे, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी, जयप्रकाश दगडे, विवेक सौताडेकर, भाऊसाहेब उमाटे, प्रा. डॉ. सुनील पुरी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारीवर्षा ठाकूर घुगे यांच्या संकल्पेनेतून 'कथा मराठवाडा मुक्तिसंग्रमाची' या पुस्तिकेची निर्मिती झाली आहे. इतिहास अभ्यासक तथा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या आठवीच्या पाठ्यपुस्तकाचे सहलेखक भाऊसाहेब उमाटे यांनी या पुस्तिकेचे लेखन केले आहे. नवीन पिढीला मराठवाड्याचा गौरवशाली इतिहास माहिती व्हावा, यासाठी ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व शाळांमधील ग्रंथालयांसाठी ही पुस्तिका वितरीत केली जाणार आहे.

# जिल्ह्यात आजपासून 'आधारवड पंधरवडा'चे आयोजन

लातूर : जागतिक जेष्ठ नागरिक दिनानिमित्त जिल्ह्यात १९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२३ या काळात 'आधारवड पंधरवडा' आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी शासकीय यंत्रणांमार्फत विविध कार्यक्रम, शिबिरे, मेळावे आयोजित करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.

लातूर जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधिक्षक. सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व समाज कल्याण सहायक आयुक्त यांच्यामार्फत 'आधारवड पंधरवाडा' अंतर्गत ज्येष्ठ नागरिक मेळावे घेण्यात येणार आहेत. या पंधरवाडामध्ये लातूर शहर महानगरपालिकेने लातूर शहरी भागातील जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांची ीिरश्र.रवहरुिव.लो या संकेतस्थळावर नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सर्व तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी पंधरवाडा काळात ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शन अदालत घ्यावी, तसेच त्यांना विशेष सहाय्य योजनांचा लाभ द्यावा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अधिष्ठाता यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी महानगरपालिका हद्दीत व ग्रामीण भागात आरोग्य शिबीराचे आयोजन करावे, मधुमेह रुग्णांना गोळ्या वाटप करणे, मोतीबिंदु असलेल्या रुग्णांची नेत्रतपासणी करण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाने ज्येष्ठ नागरिकांचे समुपदेशन शिबीर आयोजित करावे. जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाने ग्रामपंचायत पातळीवर ज्येष्ठांसाठी विशेष ग्रामसभा घ्याव्यात. तसेच त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, याबाबत सूचना देण्यात आल्याचे समाज कल्याण सहायक आयुक्त एस. एन. चिकुर्ते यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते १०१ लाभार्थ्यांना मंजूरीपत्र प्रदान

लातूर : मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत कार्यक्रम चालू आर्थिक वर्षात स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेने ३ कोटी १ लाख १५ हजार रुपये कर्ज रक्कमेचे १२६ प्रस्ताव मंजूर केली आहे. त्यापैकी १०१ लाभार्थींना कर्ज रक्कम २ कोटी ५० लाख २२ हजार रक्कमेचे मंजूरी पत्र १७ सप्टेंबर, २०२३ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या मुख्य ध्वजारोहन कार्यक्रमानंतर क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचे हस्ते वाटप करण्यात आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर यावेळी, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक गोपाळ पवार यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्यावतीने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुशिक्षीत बेरोजगार युवक, युवती /महिलांना रोजगार पुरविणेसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उत्पादन व सेवा उद्योगासाठी बँकेमार्फत कर्ज व शासनाकडून ३५ टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

सन २०२३-२०२४ साठी लातूर जिल्ह्यासाठी ७६० कर्ज प्रकरणे मंजूरीचे उदिष्ट आहे. आतापर्यंत बँकांनी ३०१ कर्जप्रस्ताव मंजूर केले आहेत. कर्जप्रस्ताव तयार करणे व मंजूरीसाठी उमेद, माविम यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमासाठी स्टेट बँक ऑफ इंडीयाचे विभागीय प्रबंधक प्रविण मांडेकर, आरसीसीचे मुख्य प्रबंधक श्री. नागाबाबू, आरबीओचे उपप्रबंधक मनोजकुमार सुर्यवंशी, आरसीसी एसबीआयचे प्रबंधक अमोल रेवडकर हे उपस्थित होते.

# टपाल विमा आणि ग्रामीण टपाल जीवन विमासाठी थेट अभिकर्ता नेमणूकीसाठी २५ सप्टेंबर रोजी मुलाखती

लातूर : भारतीय डाक विभागाकडून डाक जीवन विमा योजनेतंर्गत लातूर आणि उस्मानाबाद जिल्हा अंतर्गत टपाल जीवन विमा व ग्रामीण टपाल जीवन विमासाठी थेट अभिकर्ता (डायरेक्ट एजेंट) यांची नेमणूक मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. इच्छूक उमेदवारांनी लातूर येथील डाकघर अधीक्षक कार्यालय मुख्य डाकघर इमारत, दुसरा मजला, येथे सोमवार २५ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत शैक्षणिक कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन डाकघर अधीक्षक यांनी केले आहे.

उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी १८ वर्षापेक्षा कमी व ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असावा. उमेदवाराची निवड थेट मुलाखतीद्वारे केली जाईल. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपये अनामत रक्कम सुरक्षा ठेव ठेवावी लागेल. ही ठेव एनएससी अथवा केव्हीपीच्य स्वरुपात राहील. तसेच परीक्षा शुल्क ४०० रुपये व परवाना शुल्क ५० रुपये जमा करावे लागेल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर डाक विभागाकडून तात्पुरत्या स्वरुपाचा परवाना देण्यात येईल. जो आयआरडीएची परवाना परीक्षा पास केल्यानंतर कायम स्वरुपाच्या परवान्यामध्ये रुपांतरित केला जाईल. मुलाखतीस येतांना सोबत विहीत नमुन्यातील अर्ज आणि सर्व शैक्षणिक कागदपत्रासह आधारकार्ड, पॅनकार्ड, ०३ पासपोर्ट आकाराचे फोटो व अन्य झेरॉक्स प्रती सोबत आणाव्यात असे आवाहन धाराशिव विभाग लातूर मुख्यालयाचे डाकघर अधीक्षक यांनी केले आहे.

# बोकनगाव येथे पशुपालन व दुग्ध व्यवसाय शिबीर उत्साहात

लातूर : मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवानिमित्त मुरुड येथील कुक्कुट प्रशिक्षण केंद्र व लातूर रोटरी क्लब मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने बोकनगाव येथे पशुपालन व दुग्ध व्यवसायाविषयी सात दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन माफसूचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाणे यांनी केले.

परभणी पशूवैद्यकीय महाविद्यालय प्राचार्य डॉ. नितीन मार्कंडे यांनी प्रजनन व गोठा नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या शिबिरात डॉ. बुकशेटवार, डॉ. गणेश निटुरे, डॉ. दग्गेश गोलहेर, डॉ. बालाजी देवकते, डॉ. शिवाजी क्षीरसागर, डॉ. किरण दंडे, डॉ. गुणवंत बिराजदार, डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी पशुपालन व दुग्ध व्यवसाय यातील विविध विषयावर मार्गदर्शन केले. या सात दिवसीय प्रशिक्षण समारोप प्रसंगी डॉ. योगेशसिंह बायस यांनी तरुणांनी दुग्ध व्यवसाय हा मुख्य व्यवसाय म्हणून स्विकारावा व स्वावलंबी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आयोजन एस.डी. कोळेकर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच सुरेखाताई स्वामी , उपसरपंच किशोर दाताळ, बंडू शिंदे, पंडित दाताळ, सुरेश शिंदे, बळवंत किरेकर यांच्यासह गावातील व परिसरातील नवतरुणांनी प्रयत्न केले . या कार्यक्रमात २५५ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजकुमार पडिले यांनी केले.

## CHANGE OF NAME

I have change my name **BAGWAN ANISA JAVED TO CHOUDHARY ANISA MUSTAQUIM** hence forth this declaration and will be known by this name will be use **CHOUDHARY ANISA MUSTAQUIM** in future the same will be used by my all familly.

**Old Name :- BAGWAN ANISA JAVED**
**New Name :- CHOUDHARY ANISA MUSTAQUIM**
**Address :- Sale Galli, Latur (M.S.) 413512**

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते